नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

✻ वर्ष ५४ ✻ अंक २१४ ✻ ✻ नागपूर ✻ सोमवार, दि.११ नोव्हेंबर २०२४ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्रलेख

## खरीखरी...

## लोकशाहीतील चढती भाजणी

स्वातंत्र्य मिळाल्यापासून लोकशाहीसाठी मतदान होत असते. 1952 ते 1962 पर्यंत देशात काँग्रेस हाच एकमात्र पक्ष होता. त्यावेळी मतदारांना कार्ड स्वरूपात मतपत्र दिले जात होते आणि मतदान कक्षात जाऊन त्याला पसंतीच्या उमेदवाराच्या पेटीत आपले मत टाकावे लागत होते. मात्र त्यावेळीही थोड्याफार प्रमाणात ही मतपत्रे विकत घेतली जात होती. त्यामुळे त्याच्या मध्येही गैरव्यवहार होत होता. हे दिसून आल्यामुळे त्यानंतर उमेदवारांसाठी मतपत्रिका छापून घेण्यात येऊ लागल्या आणि संपूर्ण उमेदवारांची यादी असलेल्या मतपत्रिकेवर शिक्का मारावा लागत होता. या पद्धतीने मतदाराला आपली मतपत्रिका तेथे असलेल्या कर्मचा?यांच्या समोरच पेटीत टाकावी लागत असे. हा प्रकार वषानुर्वर्ष चालला. त्यानंतर नवीन शतकात इलेक्ट्रॉनिक व्हेंडिंग मशीन अर्थात ईव्हीएम आले. ओरिजिनल मतदार कार्डांच्या नंतर झालेला हा तिसरा बदल आहे. म्हणजेच आता ना मतदार कार्ड ना मतपत्रिका, आता बटन दाबले की काम झाले. अशाप्रकारे लोकशाहीच्या मतदानाची चढती भाजणी आकाराला आलेली आहे. पूर्वीच्या काळी स्वयंचलित गाड्यांना हँडल मारून सुरू करावे लागत असे. तेव्हा मोटरसायकल असो किंवा स्कूटर असो. चालू करण्यासाठी कीक मारावी लागत असे. आता मात्र तसे नाही. चार चाकी असो, किंवा स्कूटर असो, किंवा मोटरसायकल असो. फक्त स्विच दाबला की गाडी सुरू होते. तशीच आपल्या मतदानाची गाडीही बोटावर शाई लावणे आणि बटन दाबण्यापूरती उरलेली आहे, असो. हा झाला मतदारांचा कार्यक्रम, पण बिचाऱ्या उमेदवारांना किती किती गोष्टींसाठी काय काय करावे लागते. याचा विचार केला तर सध्याच्या निवडणुकीसाठी उभे राहणे आणि नियम पालन करणे मोठेच कठीण आणि जिकीरीचे झालेले आहे. आचारसंहिता पूर्वी होती. पण 90 च्या दशकात टी. एन. शेषन नामक निवडणूक आयुक्त आले आणि त्यांनी त्या आदर्श आचारसंहितेचा आदर्श म्हणजे काय? याचा वस्तूपाठ सांगून अयोग्य ठिकाणी कारवाई करून योग्य आचारसंहिता काय असते. ते दाखवून दिले होते. शोले चित्रपटात जसा गब्बरचा धसका होता. त्या चित्रपटात माता आपल्या मुलाला, बाळा रडू नको नाहीतर गब्बर येईल. असा धाक दाखवित त्यामुळे मूल रडायचे थांबत असे. असा त्या चित्रपटातील गब्बरचा जबरदस्त धाक होता. तसेच निवडणुकीमध्ये उभे असलेल्या उमेदवारांना 'आचारसंहिता पाळा नाहीतर, जाळून टाकतील शेषनच्या ज्वाळा' असा जबरदस्त धाक होता. खर्चावर मयार्दा असली पाहिजे. विनाकारण मोठमोठ्या सभा उमेदवारांनी घेऊ नये. खाण्यापिण्यावर ठराविकच खर्च व्हावा. असे कित्येक नियम आले. आता उमेदवारांना आपल्या संपत्तीची घोषणा करावी लागते. आपल्यावर कोणते आरोप, तेही कोणत्या गुन्ह्याखाली आहेत. याची जाहिरात वर्तमान पत्रात प्रकाशित करावी लागते. त्यामुळे आपले लोकप्रतिनिधी कसे आहेत, हे लोकांना समजावे अशी ही व्यवस्था आहे. आता या निवडणुकीतील खचार्बाबत जी तरतूद आहे. त्यात तरतुदीतील फोलपणा दिसतो, पण सिद्ध करता येत नाही. पूर्वीच्या काळी पक्षाचे कार्यकर्ते स्वतःच्या खिशातून आपल्या प्रचारासाठी आलेल्या लोकांचे खाणेपिणे करून आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी जीवाचे रान करीत असत. आम्ही असे अनेक उमेदवार पाहिलेले आहेत की, ज्यांचा खर्च अगदी काही हजारांच्या घरातच असायचा. दोन-चार उदाहरणे समोरच आहेत. जळगाव जामोद मतदारसंघात शेकापचे के आर पाटील नावाचे उमेदवार तेव्हाच्या उमेदवारी डिपॉझिटचे शंभर ते दोनशे रुपये तेवढेच भरत असत. त्यानंतर जनतेच्या सहभागातून त्यांचा प्रचार चालत असे. दोन ते चार हजार रुपयांचा खर्चही जनता करीत असे आणि विशेष म्हणजे ते निवडून येत असत. आम्ही हे उदाहरण मुद्दाम दिलेले आहे. असे अनेक पुढारी संपूर्ण महाराष्ट्रभरात रात्रंदिवस पाचही वर्ष जनतेच्या समस्यांसाठी उभे राहत असत. तेव्हा आदर्श आचारसंहिता नसली. तरी पुढा?यांचे वागणेच इतके आदर्श असे की, त्या काळात एखाद्या उमेदवारावर छोटासा कलंक असला. तरी त्याला लाज वाटत असे. आता आमच्या अनेक पुढाऱ्यांना स्वतःवरचा कलंक म्हणजे कलंकशोभा वाटते. यामुळेच बलात्कारापासून खुनाच्या आरोपापर्यंत घोषित असलेले सर्वच उमेदवार उजळ माथ्याने निवडून येत असतात. आज उमेदवारांना केवळ कार्यकर्त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करावी लागत नाही. तर इतरही अनेक छुपे खर्च गुपचूप चोरीछुपे करावे लागतात. पुणे, मुंबईसारख्या महानगरात तर या प्रकारच्या खर्चांना काही सीमाच नसते. निवडणूक आयोगाचे निरीक्षक आणि शेषन साहेबांच्या जागी असलेले पुळचट आयुक्त यांच्यासोबत सर्वांना सर्व काही ठाऊक असते. मात्र सर्वच जाणूनबुजून गप्प बसतात. आता निवडणूक हा मोठा व्यवसाय झालेला आहे. निवडणूक लढवीत असलेल्या उमेदवारांवर खचार्साठी अनेक प्रकाराने मदत करणारे मोठे उद्योजक आहेत. भविष्यात आपले काम करून घेण्यासाठी उपयुक्त असतील अशा उमेदवारांना किती आकड्यांची मदत दिली जाते. याचे खरे आकडे समोर आले. तर भल्याभल्यांना आकडी येईल आणि तुमच्या आमच्यासारख्यांचे डोळे पांढरे होतील. एकदा निवडून आल्यावर पुढच्या पाच वर्षात लोकसभेसाठी होणारा खर्च वसूल करायचा असतो. आपण निवडणुकीसाठी केलेला खर्चही वसूल करायचा असतो. विधानसभा मतदारसंघात फिरण्यासाठी महागड्या वाहनाची इंधनासह सोय करावी लागते. तेव्हा मतदार संघासाठी सरकारकडून येणारा निधी आणि लाखो रुपयांच्या पगाराची तरतूद यामुळे आपल्या लोकप्रतिनिधींकडे अपेक्षेने पाहणा?या जनता जनार्दनाचा अनेकदा अपेक्षाभंग होतो. अशी ही आपली निवडणूक सध्या महाराष्ट्रात साग्रसंगीत सुरू आहे. मोठमोठ्या लोकांच्या शब्दप्रदूषणामुळे अनेकांना गुदमरल्यासारखे वाटते. पण त्यांना लाज नाही आणि आपल्याला काहीच इलाज नाही. हेच खरे आहे. तेव्हा अशा निवडणुकीचा डोके न वापरता शांतपणे बघत बघत आनंद घ्यावा. हीच आमची खरीखरी अपेक्षा आहे. एकूणच, भारतीय लोकशाहीचा विजय असो!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# मविआ आणि भाजपाचे जाहीरनामे आले!



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** महाविकास आघाडी आणि महायुतीमधील भाजपाने आज त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केलेत. महाविकास आघाडीने त्यांच्या जाहीरनाम्याला 'महाराष्ट्रनामा' असे नाव दिले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, महाराष्ट्राच्या विकासाचे पाच स्तंभ आहेत. महाराष्ट्राचा विकास आणि प्रगती कृषी, ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, शहरी विकास, पर्यावरण आणि लोककल्याण यावर आधारित असेल.

**महाराष्ट्रासाठी मविआची ५ गॅरंटी**

- कुटुंब रक्षणासाठी विमा - कुटुंबाला 25 लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा.
- महालक्ष्मी योजना - महिलांना दर महिन्याला 3 हजार रुपये आणि महिला व मुलींसाठी मोफत बस सेवा.
- कृषी समृद्धी - शेतकऱ्यांचे 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांचे प्रोत्साहन
- युवकांना मदत - बेरोजगार तरुणांना दर महिन्याला 4 हजार रुपयांपर्यंतची मदत.
- समानतेची हमी - जातनिहाय जनगणना आणि आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा हटवणार.

दुसरीकडे, भाजपने त्यांचा जाहीरनामा (संकल्प पत्र) प्रसिद्ध केला. त्यात 25 लाख नोकऱ्या, महाराष्ट्राचा संपूर्ण विकास, कर्जमाफी आणि महिलांना 2100 रुपये देण्याचे आश्वासन आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने रविवारी आपला जाहीरनामा (संकल्प पत्र) प्रसिद्ध केला. गृहमंत्री अमित शहा यांनी स्वतः जाहीरनामा जाहीर केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 25 लाख नोकऱ्या, महाराष्ट्राचा संपूर्ण विकास, शेतकऱ्यांसाठी भावांतर, कर्जमाफी आणि महिलांना 2100 रुपये देण्याचा आम्ही संकल्प केला आहे.

जाहीरनाम्यातील 7 मुद्यांवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वक्तव्य केले.

■ महाराष्ट्र पुनरुज्जीवन : हा म्हणाले, महायुतीने शेतकऱ्यांचा सन्मान करण्याचा, महिलांचा स्वाभिमान जागृत करण्याचा आणि महाराष्ट्रातील लोकांचा वारसा पुनरुज्जीवित करण्याचा संकल्प केला आहे.




■ काश्मीर निवडणुका : शहा म्हणाले, आज मी आंबेडकरांच्या भूमीवर उभा आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांनी जम्मू-काश्मीरच्या भूमीवर भारतीय राज्यघटनेनुसार शपथ घेतली आहे. कलम 370 हटवल्यानंतर ही निवडणूक झाली. याचा देशाला अभिमान आहे.

■ राहुल गांधी आणि सावरकरः राहुल गांधींनी वीर सावरकरांसाठी दोन चांगले शब्द बोलून दाखवावे, असे शहा म्हणाले.

काँग्रेसची आश्वासनेः काँग्रेसने आश्वासने दिली तर ती विचारपूर्वक द्यावीत, कारण ते आश्वासने पूर्ण करत नाहीत. उद्धव ठाकरेंची भूमिका, वक्फ विधेयक यावरही अमित शहा यांनी वक्तव्य केले.

यापूर्वी, 5 ऑक्टोबर रोजी एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्या जाहीरनाम्यात 10 आश्वासने जाहीर केली होती. ही आश्वासने सरकार स्थापनेच्या 100 दिवसांत पूर्ण केली जातील, असे शिंदे यांनी सभेत सांगितले होते.






## सर्व सात राज्यात ट्रम्प जिंकले

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. १०:** अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे सर्व निकाल जाहीर झाले आहेत. शनिवारी अमेरिकेच्या ॲरिझोना राज्यातही डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले. यासह त्यांनी सर्व 7 स्विंग राज्ये जिंकली आहेत. ॲरिझोनाच्या 11 जागा (इलेक्टोरल व्होट) ही त्यांच्या खात्यात आल्या आहेत.

अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाने 50 राज्यांतील 538 जागांपैकी 312 जागा जिंकल्या. तर डेमोक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांना कडवी झुंज देऊनही केवळ 226 जागा जिंकता आल्या आहेत. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एकूण 538 जागा



आहेत. बहुमतासाठी 270 चा आकडा आवश्यक आहे.

ॲरिझोनाची गणना अमेरिकेतील स्विंग राज्यांमध्ये केली जाते. येथे विजयाचे अंतर खूपच कमी आहे. मात्र, गेल्या 70 वर्षांत डेमोक्रॅटिक पक्षाला येथे केवळ दोनदाच विजय मिळवता आला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन हे बुधवारी पुढील राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची व्हाईट हाऊसमध्ये भेट घेणार आहेत.

## मविआ म्हणजे विकास विरोधी आघाडी

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १० :** महाविकास आघाडी म्हणजे विकास प्रकल्प विरोधी आघाडी आहे. या आघाडीने विकासाला कायम विरोध केला असल्याची टीका भाजप नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली.

तुष्टीकरणाचे गलिच्छ राजकारण करणाऱ्या काँग्रेसने इतर मागासवर्गीय समूहाला आरक्षण देण्यात अगदी नेहरूंच्या काळापासून कडवा विरोध केला असून आजही काँग्रेस ओबीसी विरोधीच असल्याचा घणाघाती आरोपही शहा यांनी केला. यामुळे आघाडीला पराभूत करण्याचे आवाहन करतानाच राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यावर लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणाही त्यांनी केली आहे.

मलकापूर मतदारसंघाचे भाजपा तथा युतीचे उमेदवार माजी आमदार चैनसुख संचेती यांच्या प्रचारार्थ आज अमित शहा यांची जंगी प्रचार सभा मलकापूर येथे पार पडली. अमित शहा यांनी महाविकास आघाडी, काँग्रेस पक्ष आणि



अधूनमधून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांना लक्ष्य करीत खरपूस टीका केली.

महाविकास आघाडी म्हणजे विकास विरोधी आघाडी अशी व्याख्या करीत ते म्हणाले की आघाडीने राज्यातील प्रत्येक मोठ्या विकास प्रकल्पाला विरोध केला आहे.

## आगीत तिघांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १०:** फुलंब्री जवळील दरी फाटा येथे एका प्लास्टिक साहित्य विकीच्या दुकानाला भीषण आग लागली. या घटनेत तिघे जण जळून ठार झाले तर दोघे जण गंभीर जखमी झाले.

रात्री दीड वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे. आग लागल्याची माहिती दुकान मालक व शेजारी असलेल्या दुकान मालकांना समजली असता ते दुकान उघडण्यास धावले. दुकानाचे शटर उघडताच आतमध्ये तयार झालेल्या गॅसमुळे तीन लोक वेगाने बाहेर फेकले गेले, यात ते लोखंडी पार्टवर आदळले तसेच आगीत होरपळले. तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर घाटीमध्ये उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नितीन रमेश नागरे, राजू सलीम पटेल, गजानन दादाराव वाघ यां तिघांचा मृत्यू झाला आहे. तर अजय सुभाष नागरे आणि शाहरुख पटेल हे गंभीर जखमी असल्याने त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहे.

## भाजप कार्यकर्त्याची हत्या

■ **वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १०:** पश्चिम बंगालमधील दक्षिण 24 परगणा येथील भाजप कार्यालयात काम करणाऱ्या एका पक्ष कार्यकर्त्याची हत्या करण्यात आली. त्यांचा मृतदेह पक्ष कार्यालयात आढळून आला. याप्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली.

पोलिसांनी सांगितले की, मृत पृथ्वीराज नास्कर हे बंगाल भाजपचे सोशल मीडिया समन्वयक होते. धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. त्यांच्या शरीरावर अनेक खुणा आहेत. माझ्या मुलाने प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणाला विरोध केला होता. याबाबत स्थानिक टीएमसी नेत्यांनी त्यांना धमकी दिली होती, असे मृतकाच्या वडीलांनी सांगितले.

## मुंबईत सापडल्या चांदीच्या विटा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पैसे सापडत असल्याच्या घटना उघडकीस येत आहेत. तसेच आता मुंबईच्या विक्रोळी येथे एका कॅश व्हॅनमध्ये 6500 किलो चांदीच्या विटा सापडल्या आहेत.

विक्रोळी पोलिसांनी व निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने पकडलेल्या या विटा एकूण साडेसहा टन इतक्या असल्याचे समोर आले आहे. यांची किंमत कोटींच्या घरात आहे. या विटा मुलुंड येथील एका गोदामात नेण्यात येत होत्या. निवडणूक आयोग व पोलिस याचा अधिक तपास करत आहेत.

मुंबईमध्ये याआधी देखील अनेक ठिकाणी पैशांचे घबाड सापडले असल्याचे समोर आले आहे. भुलेश्वर येथे देखील 1 कोटी 32 लाख रुपयांचा मुद्देमाल सापडला होता. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे.

## अस्तित्व टिकवण्यासाठी राष्ट्रवादीला तूर्त भाजपचा आधार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** महायुतीत सहभागी असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भूमिका ऐन विधानसभेच्या तोंडावर भाजपच्या विरुद्ध दिशेने जात आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. निवडणूक निकालानंतर अजित पवार भाजपसोबत राहतील का? असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

मोदींच्या सभांना मागणी वाढत असताना अजित पवारांनी मात्र बारामतीत त्यांची सभा नाकारली. लोकसभेच्या वेळी मोदींनी शरद पवारांचा उल्लेख भटकती आत्मा असा केल्याने बारामतीत अजित पवारांना फटका बसला होता.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगींनी हिंदू मतांच्या ध्रुवीकरणासाठी बटेंगे तो कटेंगेचा नारा दिला. मात्र फुले-शाहू - आंबेडकरांचा महाराष्ट्र हे कदापि सहन करणार नाही, असे सांगून अजित पवारांनी विरोध केला.

दाऊदशी संबंधाच्या आरोपाने तुरुंगात जाऊन आलेल्या नवाब मलिकांना उमेदवारीस भाजपने तीव्र विरोध केला होता. त्यांचा प्रचार करणार नाही, असेही जाहीर केले होते. तरीही विरोध झुगारून अजित यांनी मलिकांना अधिकृत उमेदवारी दिलीच.

शरद पवारांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारे भाजप समर्थक आमदार सदाभाऊ खोत यांना



अजित पवारांनी झापले. त्यांना जाहीर माफी मागण्यास भाग पाडले. यापुढे अशी वक्तव्ये होऊ नयेत म्हणून नाराजी व्यक्त केली.

लोकसभेत जनाधार घटल्याने भाजपशी युतीची त्यांना गरज आहे. म्हणूनच ५२ जागांवर बोळवण करण्यात आली.तरी युतीकडूनच निवडणूक लढवतात. लाडकी बहीणचा लाभ घ्यायचा असेल तर महायुतीत राहावे लागेल, याचे त्यांना भान आहे. निकालानंतर किंगमेकर होण्याची संधी मिळालीच तर युतीत राहतील का? याविषयी शंका आहे.

## पतीपत्नीसह मुलाचा अपघाती मृत्यू

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. १०:** परभणी ते वसमत मार्गावर असोला पाटीजवळ भरधाव वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला.

औंढा नागनाथ तालुक्यातील अंजनवाडी येथील एकनाथ बाबाराव घुगे (३५) त्यांची पत्नी शुभांगी एकनाथ घुगे (३०) व त्यांचा मुलगा समर्थ एकनाथ घुगे (१२) हे आज सकाळी मुलाची प्रकृती दाखविण्यासाठी दुचाकीने परभणी येथे गेले होते.

तिघेही गावाकडे परत येताना भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात तिघेही रस्त्यावर आदळले. त्यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने मोठा रक्तस्त्राव झाला. या अपघातामुळे परभणी ते वसमत मार्गावरील वाहतुक काही काळ विस्कळीत झाली होती.

या मार्गावरील प्रवाशांनी अपघाताची माहिती परभणी पोलिसांना दिली. अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## ...हे तर मुन्नाभाईमधले सर्किट?

### उद्धव ठाकरेंची सडकून टीका

■ **वृत्तसंस्था, सांगोला, दि. १०:** सांगोला येथे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. यावेळी बोलताना त्यांनी भाजप तसेच महायुतीवर जोरदार हल्लाबोल केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना 'सर्किट' असे म्हणत त्यांना टोला लगावत शहाजी बापू यांच्यावर देखील टीका केली आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, मागच्या वेळेस आपण एकावर विश्वास ठेवला होता. मात्र त्यांनी गद्दारी केली. काय झाडी, काय डोंगर म्हणत गेले तिकडे. रेल्वेमध्ये कोणाची ओळख आहे का? आपल्याला एकच तिकीट बूक करायचे आहे 23 तारखेचे. गुवाहाटीला जाऊन मोजत बसा झाडं, अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी शहाजी बापू यांच्यावर नाव न घेता टीका केली आहे. पुढे ते म्हणाले, तुम्हाला तिकडचे डोंगर माहीत आहेत, पण इथले टकमक टोक तुम्हाला माहीत नाही. निवडणुकीनंतर जनता तुम्हाला हे टकमक टोक दाखवेल, तुमच्या सत्तेचा कडेलोट केल्याशिवाय राहणार नाही.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, तुम्ही मुन्नाभाई बघितला आहे का हो? त्या मुन्नाभाईमध्ये सर्किट आहे, तसे हे अमित शहा आहेत, असे म्हणत अमित शहांना टोला लगावला आहे. अमित शहा फिरत आहेत महाराष्ट्रात, काय त्यांची ती भाषा. महाराष्ट्रातल्या शेतक?यांना हमीभाव मिळत नाही आणि हे काय सांगतात 370 हटवला, राम मंदिर बांधले, याचा



महाराष्ट्रातल्या माझ्या शेतकऱ्यांना काय उपयोग आहे? हमीभाव मिळणार आहे का 370 हटवून? असा प्रश्न देखील उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी यांना विचारला आहे.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, अमित शहा तुम्ही जरा डोक्याला ब्राह्मी तेल लावा, कारण तुम्हाला स्मृतिभ्रंश झाला असेल तर आठवण करून देतो की 370 कलम हटवताना शिवसेनेने तुम्हाला पाठिंबा दिला होता. 370 कलम हटवल्यानंतर तुम्ही किती काश्मिरी पंडितांना घरी घेऊन गेलात हे आधी सांगा, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

इथले जे मूलभूत प्रश्न आहेत त्यावर का नाही बोलत? मुंबई कोणाच्या घशात घालत आहेत हे तुम्हाला कळत आहे. माझे सरकार आल्यावर मी मुंबई आदानीच्या घशात जाऊ देणार नाही. मी भूमिपुत्रांना परवडणारे घरे देणार असल्याचे ते म्हणाले.

# रणभूमी

## माजी मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबियांमध्ये फूट

**राज्याच्या राजकारणामध्ये वर्चस्व राखून असलेल्या नाईक कुटुंबियांमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर फूट पडली आहे. या बंजाराबहुल मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मनोहर नाईक यांच्या दोन्ही मुलांनी एकमेकांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे.**

महायुतीच्या वतीने आमदार इंद्रनील नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला, तर त्यांचे मोठे बंधू ययाती नाईक यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. महाराष्ट्राच्या या प्रतिष्ठित राजकीय कुटुंबातील वादामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पुसद हा बंजाराबहुल मतदारसंघ आहे. येथे बंजारा, आदिवासी, मराठा, कुणबी समाजाची मते अधिक आहेत. ययाती नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून महाविकास आघाडीची उमेदवारी मागितली होती; मात्र येथे शरद पवार यांनी मराठा कुणबी समाजाचे शरद मैंद यांना पक्षाची उमदेवारी दिली. त्यामुळे नाराज झालेल्या ययाती नाईक यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. आपल्या फलकांवर ययाती यांनी वडील मनोहरराव नाईक यांचे छायाचित्रही वापरले नाही. केवळ वसंतराव नाईक आणि सुधाकरराव नाईक यांचे छायाचित्र लावल्याने मतदारसंघामध्ये नाईक कुटुंबातील वादाबद्दल चर्चा आहे. शरद पवार हे काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर सुधाकरराव नाईक त्यांच्यासोबत गेले. तेव्हापासून नाईक कुटुंबीय राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. गेल्यावर्षी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर पुसदचे आमदार इंद्रनील नाईक हे अजित पवार गटात गेले. त्यांचे वडील मनोहरराव नाईक यांनी याबाबत कधी जाहीर भाष्य केले नसले, तरी मुलासोबत तेही अजित पवार गटामध्ये असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे ययाती यांना वडील मनोहरराव नाईक यांची साथ नसावी, अशी चर्चा आहे. महाविकास आघाडी नाईक कुटुंबातील इंद्रनील आणि ययाती या भावांमधील वादाचा फायदा करून घेण्याच्या तयारीत आहे. मनोहरराव नाईक आणि त्यांचा मुलगा आमदार इंद्रनील नाईक यांनी पक्षाची साथ सोडल्यामुळे नाराज झालेल्या शरद पवार यांनी ययाती यांना उमेदवारी न देता एका दगडात दोन पक्षी मारल्याचे बोलले जाते. या बंजाराबहुल मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीची उमेदवारी न दिल्यास ययाती नाईक बंडखोरी करणार हे गृहीत धरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने जाणीवपूर्वक मराठा उमेदवार दिला. शरद पवार यांनी पुसदमध्ये बंजारा मते नाईक कुटुंबियांमध्ये विभाजित झाल्यास मराठा, कुणबी, अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्याकांची मते महाविकास आघाडीकडे वळतील, या सूत्राने खेळी खेळल्याची चर्चा आहे. नाईक कुटुंबातील हा वाद कायम राहिल्यास तो महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडेल, असे चित्र सध्या आहे.

यवतमाळ लोकसभा मतदारसंघामध्ये पुसद मतदारसंघ येतो. विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवर वसलेल्या या मतदारसंघामध्ये पुसद आणि महागाव तालुक्याच्या काही भागांचा समावेश होतो. हा बंजाराबहुल मतदारसंघ असल्याने बंजारा समाज ज्याच्या पाठिशी तोच इथला आमदार बनणार, हे गणित ठरलेले आहे.

म्हणूनच नाईक कुटुंबातल्या नेत्याशिवाय इतर कोणीही या मतदारसंघाचे नेतृत्व करू शकलेले नाही. या मतदारसंघात आदिवासी समाजाचा प्रभाव अधिक असून ओबीसी आणि मुस्लिम समाजाचीही मते आहेत. पुसद म्हटले, की सर्वांत आधी वसंतराव नाईक यांचे नाव समोर येते. त्यांनी सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषवले होते. महाराष्ट्राची स्थापना होण्याच्या आधी वसंतराव नाईक यांनी पुसद विधानसभा निवडणूक लढवली होती. १९५२ मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा ते पहिले महसूल



ययाती नाईक / इंद्रनील नाईक

मंत्री होते. मारोतराव कन्नमवार यांच्या निधनानंतर वसंतराव नाईकांकडे मुख्यमंत्रिपदाची धुरा आली. १९७५ पर्यंत ते मुख्यमंत्रिपदावर कायम होते. वसंतराव यांचे पुतणे सुधाकरराव नाईक हेसुद्धा राजकारणात सक्रिय झाले होते. पुढे सुधाकरराव नाईक राज्याचे मुख्यमंत्री झाले. पुसद हा एकाच कुटुंबातून राज्याला दोन मुख्यमंत्री देणारा मतदारसंघ ठरला. १९९९ मध्ये शरद पवारांनी काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. तेव्हा सुधाकरराव यांनी शरद पवारांसोबत राष्ट्रवादीमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. सुधाकरराव यांचे भाऊ मनोहर यांनी २००४ पासून २०१४ पर्यंत या मतदारसंघामधून निवडणूक लढवली होती; मात्र २०१४ मध्ये त्यांना पुतणे नीलय यांच्या बंडखोरीचा सामना करावा लागला. पुढे नीलय नाईक यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये नीलय यांनी मनोहर नाईक यांचा लहान मुलगा इंद्रनील नाईक यांच्याविरोधात निवडणूक लढवली. या वेळी

### लक्षवेधी लढत

पुसदमधल्या मतदारांनी इंद्रनील यांना निवडून दिले होते. मनोहरराव नाईक यांना ययाती आणि इंद्रनील अशी दोन मुले आहेत. इंद्रनील हे सध्या पुसदमधील आमदार आहेत, तर ययाती हे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आहेत. अडीच वर्षांपूर्वी राज्यात झालेल्या सत्तानाट्यानंतर महाविकास आघाडी आणि महायुती अस्तित्त्वात आली. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पुसदच्या नाईक घराण्यातही फूट पडली. इंद्रनील यांनी अजित पवार गटामध्ये जाताना आपल्याला विश्वासात घेतले नाही, याबद्दल ययाती नाईक यांच्यात नाराजी होती, तर दुसरीकडे २०१९ मध्ये आपल्याला डावलून आमदारकीची संधी इंद्रनील यांना मिळाल्याने ययाती हे संधीच्या शोधात होते. ययाती यांनी शरद पवार गटातच राहणे पसंत केले. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या संजय देशमुख यांना मदत करताना आपण विधानसभेसाठी इच्छुक असल्याचे ययाती यांनी सांगितले होते.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळावी यासाठी ते आग्रही होते. त्या अनुषंगाने ययाती यांनी मतदारसंघामध्ये मोर्चेबांधणीही केली होती. संभाव्य उमेदवारांच्या यादीतही त्यांचे नाव होते; मात्र ऐनवेळी ययाती यांना उमेदवारी न देता शरद मैद यांना तिकिट देण्यात आले. आमदार इंद्रनील नाईक यांनी पक्षाची साथ सोडल्यामुळे शरद पवार नाराज असल्याची चर्चा होती. यामुळेच त्यांनी ययाती यांना उमेदवारी न देता एका दगडात दोन पक्षी मारल्याचे म्हटले जात आहे.

गेल्या पाच वर्षांत इंद्रनील हे सर्वसामान्य जनतेच्या संपर्कात नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मनोहर नाईक यांच्यासारखा जनसंपर्क इंद्रनील यांचा तयार करता आला नाही. त्यामुळे पक्षफुटीचाही परिणाम या मतदारसंघात दिसेल, अशी शक्यता राजकीय विश्लेषक वर्तवत आहेत. दुसरीकडे ययाती यांनी गेल्या पाच वर्षांत आपला जनसंपर्क चांगलाच वाढवला आहे. ययाती यांच्याबद्दल या मतदारसंघामध्ये थोडी सहानुभूतीसुद्धा आहे. या मतदारसंघातील सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे बेरोजगारी. यवतमाळ हे कापसासाठी ओळखले जाते; पण इथे कापूस आणि सोयाबीनला भाव मिळत नसल्याने, शेतकरी नाराज आहेत. त्यामुळे पुसद मतदारसंघातील तरुण आणि शेतकरी यांचे प्रश्न समजून त्या अनुषंगाने काम करणाऱ्या नेतृत्त्वाला जनतेची साथ मिळू शकते, असा अंदाज आहे.

## चार मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात रस्सीखेच

**सातारा हा तीन माजी आणि एका आजी मुख्यमंत्र्यांचा जिल्हा. या जिह्यामध्ये माजी मुख्यमंत्री, एक कॅबिनेट मंत्री आणि दोन माजी मंत्र्यांसह काही मातब्बर उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.**

सातारा जिल्ह्याने यशवंतराव चव्हाण, बॅ. बाबासाहेब भोसले, पृथ्वीराज चव्हाण आणि एकनाथ शिंदे असे चार मुख्यमंत्री राज्याला दिले. शिंदे हे ठाण्यातून निवडून येत असले, तरी ते वाई तालुक्यातील आहेत. सातारा जिल्ह्यातील आठही मतदारसंघांमधील प्रमुख लढतींकडे सर्वांचे लक्ष आहे. कराड दक्षिण, कराड उत्तर, पाटण, कोरेगाव या मतदारसंघांमध्ये प्रतिष्ठेच्या लढती होत आहेत. उमेदवारी जाहीर होईपर्यंत एकतर्फी वाटणाऱ्या मतदारसंघामध्येही आता बलाढ्य उमेदवारांचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यात वाई, माण, फलटण या मतदारसंघांचा समावेश आहे. कराड दक्षिणमधून काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण उमेदवार आहेत. ते यापूर्वी याच मतदारसंघातून २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये निवडून आले होते. दोन्ही वेळा भाजपच्या डॉ. अतुल भोसले यांनी त्यांच्याशी निकराची लढत दिली. त्यापूर्वी डॉ. भोसले यांनी कराड उत्तरमधूनही निवडणूक लढवली होती. तिन्ही वेळा त्यांना यशाने हुलकावणी दिली. आता त्यांच्या पदरात हार पडणार की विजयाची माळ पडणार याबाबत उत्सुकता



आहे. चव्हाण यांनी मुख्यमंत्रिपदाच्या तसेच खासदार आणि केंद्रात मंत्री असण्याच्या काळात त्यांनी विविध विकासकामे केली. गेल्या दोन टर्ममध्येही त्यांनी मतदारसंघाशी संपर्क ठेवत विकासकामांसाठी निधी खेचून आणल्याचे सांगितले जाते. त्याशिवाय ही शेवटची निवडणूक असल्याचे भावनिक आवाहन त्यांनी केले आहे. चव्हाण राज्यपातळीवर पक्षासाठी नेतृत्व करत असल्याने त्यांची प्रतिमा मोठी आहे. त्यांच्या या जमेच्या बाजू आहेत. डॉ. भोसले यांनीही गेल्या निवडणुकीतील पराभवानंतर मतदारसंघातील संपर्क वाढविला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या बड्या नेत्यांशी संपर्कात राहिल्याने महायुती सरकारच्या काळात कराड शहर तसेच ग्रामीण भागासाठी मोठ्या प्रमाणात विकासकामे व निधी त्यांनी आणला आहे. कृष्णा साखर कारखाना, कृष्णा हॉस्पिटलसह कृष्णा समूहातील विविध शाखांच्या माध्यमातून ते कार्यरत असतात. या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत; मात्र अपेक्षेएवढा संपर्क दोन्ही बाजूने होत नसल्याच्या तक्रारी आहेत. मतदारसंघात कराड शहराचा समावेश आहे. त्यामुळे कराड नगरपालिकेच्या राजकारणाचा या मतदारसंघातील प्रभाव मोठा आहे. दक्षिणमधील उंडाळकर यांचा गट मोठा आहे. त्यामुळे उदयसिंह पाटील उंडाळकर यांची भूमिका महत्त्वाची असते. सध्या ते काँग्रेसमध्ये असल्याने ते चव्हाण यांच्यासोबत असतील, असे मानण्यात येते. कराड शहर आणि उंडाळकर गट या दोन्ही प्रभावी बाबी या मतदारसंघातील निकालावर परिणाम करणाऱ्या ठरणार आहेत.

पाटणमधून पालकमंत्री शंभूराज देसाई शिवसेना शिंदे गटाकडून रिंगणात आहेत. देसाई व पाटणकर यांच्या गटांमधील ही लढत पारंपरिक असते; मात्र या वेळी या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांशिवाय त्यांच्याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने हर्षद कदम या युवा नेतृत्त्वाला संधी दिली आहे. त्यामुळे येथील लढत आता तिरंगी होणार आहे. वास्तविक राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाकडून सत्यजितसिंह पाटणकर यांना उमेदवारी मिळण्याची खात्री येथे व्यक्त होत होती; मात्र तसे न झाल्याने पाटणकरांनी बंडाचा झेंडा फटकवला आहे. देसाई यांच्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांना पाटणमध्ये सभा घेऊन त्यांच्या काळात मतदारसंघात किती निधी आला, याचा पाढा वाचला. देसाई मंत्री असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर विकासकामे व निधी आणून त्यांनी झंझावात निर्माण केला. या बलाढ्य नेत्यापुढे उभे राहणे अवघड वाटत होते. पाटणकर यांनी तशी तयारीही केली होती. या मैदानात तिसरा उमेदवार येण्यामागे कोणाची खेळी तर नाही ना, अशी शंकाही आहे. ठाकरे गटाला उमेदवारी देण्यामागे प्रामुख्याने शिवसेनेच्या मतांची विभागणी होऊन तिसरा उमेदवार निवडून यावा, अशी रणनीती इथे दिसते. अर्थातच अशी राजकीय खेळी कोण करू शकते, याचीही जिल्ह्यात चर्चा आहे, तरीही आता या मतदारसंघात रंगत निर्माण झाली आहे.

माजी सहकार आणि पणनमंत्री बाळासाहेब पाटील कराड उत्तर मतदासंघातून षटकार मारण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून रिंगणात आहेत. भाजपच्या मनोज घोरपडे यांनी या वेळी त्यांच्यापुढे आव्हान निर्माण केले आहे. पाटील आणि चव्हाण यांच्यात पूर्वी फारसे सख्य नव्हते. एक राष्ट्रवादी काँग्रेसचा तर एक काँग्रेसचा नेता. कराड दक्षिणमध्ये जसा पाटील यांना मानणारा मोठा वर्ग आहे, तसाच कराड उत्तरमध्ये चव्हाण यांना मानणारा मोठा गट आहे. दोन्ही नेते आता महाविकास आघाडीतून महायुतीविरोधात लढत असल्याने पाटील आणि चव्हाण यांचे अनुयायी आता परस्परांना मदत करतील. कोरेगावमधून माजी मंत्री शशिकांत शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून लढत आहेत. त्यांना शिवसेनेच्या (शिंदे) आमदार महेश शिंदे यांच्याशी सामना करावा लागत आहे. हे दोन्ही आक्रमक नेते मैदानात असल्यामुळे या मतदारसंघाकडेही सर्वांचे लक्ष आहे. वाईत चौकार मारण्यासाठी सज्ज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे मकरंद पाटील यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष अरुणादेवी पिसाळ यांना रिंगणात उतरविले आहे. वाई मतदारसंघात पाटील– भोसले– पिसाळ असे प्रमुख गट आहेत. त्यात पिसाळ गट उमेदवारी मिळविण्यात यशस्वी झाला. फलटणमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विद्यमान आमदार दीपक चव्हाण लढत देत आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून सचिन कांबळे पाटील रिंगणात आहेत. ही जागा भाजपची. महायुतीमध्ये ती अजित पवार यांच्याकडे गली. त्यांनी भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी ठरवलेल्या उमेदवारालाच संधी दिली. या मतदारसंघातील ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर सध्या अजित पवार गटाकडे आहेत; परंतु ते प्रचारात नाहीत. अजितदादांनी त्यांना नोटीस देण्याचा इशारा दिला आहे.

### राज्य वार्तापत्र

आमदार चव्हाण व संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्यासह बाकीचे सैन्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडे दाखल झाले आहे. त्यापूर्वीच अजित पवार यांनी या मतदारसंघातून चव्हाण यांची उमेदवारी जाहीर करून टाकली होती; पण आ. चव्हाण यांनी ऐनवेळी पक्ष बदलल्याने अजित पवार यांनी रणजीतसिंहांचा उमेदवार आयात केला. त्यामुळे रामराजे आता प्रचाराच्या रिंगणात नाहीत. माणमध्ये भाजपचे जयकुमार गोरे बलाढ्य उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून येथील उमेदवारी प्रभाकर घार्गे यांना दिली. घार्गे यांच्याप्रमाणेच पक्षाकडून प्रभाकर देशमुख, अनिल देसाई, अभय जगताप तसेच काँग्रेसचे रणजीतसिंह देशमुख इच्छुक होते. यांच्यापैकी एकच उमेदवार रिंगणात आल्याने गोरे यांच्यासमोर आता आव्हान निर्माण झाले आहे. सातारा–जावळी मतदारसंघात विद्यमान आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले पाचव्यांदा विजयी होण्यासाठी भाजपकडून मैदानात उतरले आहेत. तुल्यबळ असणाऱ्या शिवेंद्रसिंहराजे यांना पर्याय कोण असा प्रश्न विरोधकांसमोर होता. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष असणारे अमित कदम यांनी उमेदवारीसाठी शरद पवार यांच्याकडे प्रयत्न केले. अखेर त्यांना महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी मिळाली. अमित कदम यांनी प्रचार सुरू केला आहे. या स्थितीत शिवेंद्रसिंहराजे यांनी सावध पवित्रा घेत पूर्वीपासून सुरू असलेल्या प्रचाराला अधिक गती दिली आहे.

## शिवसेनेचे बंड शेकापच्या मुळावर

**धैर्यशील पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे वाताहत झालेल्या शेकापसमोर पेण विधानसभा मतदारसंघामध्ये यंदा अस्तित्वाची लढाई असणार आहे. एकाच वेळी महाविकास आघाडीतील दोन पक्षांचे उमेदवार रिंगणात असल्याने शेकापच्या अडचणी वाढणार आहेत. शिवसेना आणि शेकापमधील जागावाटणीचा वाद शेकापच्या अस्तित्वाचा मुद्दा ठरतो आहे.**

पेण विधानसभा मतदारसंघ हा शेकापचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. २००४, २०१९ चा अपवाद सोडला तर चार दशकांहून अधिक काळ पेण मतदारसंघावर शेकापचे वर्चस्व राहिले आहे. या मतदारसंघातून विधानसभेवर सलग पाच वेळा मोहन पाटील तर दोन वेळा धैर्यशील पाटील निवडून गेले होते. त्यामुळे पुन्हा हा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी शेकाप प्रयत्नशील आहे; परंतु या मतदारसंघामध्ये शिवसेनेच्या ठाकरे गटाने बंड केले आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याऐवजी महाविकास आघाडीतील दोन पक्षांची परस्परांतील लढत विरुद्ध महायुती असे या लढतीचे स्वरुप आहे. हा मतदारसंघ पेण, सुधागड, पाली आणि रोहा तालुक्यातील काही भाग मिळून तयार झाला आहे. मतदारसंघामध्ये तीन लाख सात हजार ९७९ मतदारांचा समावेश आहे. यात एक लाख ५४ हजार ६६१ पुरुष, एक लाख ५३ हजार ३१७ महिला तर एका तृतीयपंथी मतदाराचा समावेश आहे. महायुतीकडून भाजपचे विद्यामान आमदार रवींद्र पाटील पुन्हा एकदा निवडणूक रिंगणात आहेत, तर शेकापकडून व्यवसायाने वास्तुरचनाकार असलेल्या अतुल म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून प्रसाद भोईर हे निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीतील दोन घटक पक्षांचे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पूर्वी शेकाप आणि काँग्रेस असे दोन प्रमुख पक्ष मतदारसंघामध्ये होते; मात्र गेल्या पाच वर्षांमध्ये मतदारसंघातील राजकीय समीकरणे बरीच बदलली आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीआधी काँग्रेसच्या रवींद्र ऊर्फ रविशेठ पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे मतदारसंघातील काँग्रेसचे अस्तित्व जवळपास संपुष्टात आले. भाजपकडून निवडणूक लढवून ते आमदारही झाले. शेकापच्या धैर्यशील पाटील यांचा त्यांनी पराभव केला होता; पण निवडणुकीनंतर धैर्यशील पाटील हेदेखील शेकापची साथ सोडत भाजपमध्ये दाखल झाले. त्यामुळे मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली. धैर्यशील पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे मतदारसंघामध्ये शेकापचे



अस्तित्व अडचणीत आले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार प्रसाद भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने शेकापच्या अडचणी वाढणार आहेत.


शेतकरी कामगार पक्ष हा महाविकास आघाडीचा घटकपक्ष आहे, तरीही दोन्ही पक्षांचे उमेदवार असल्याने एकमेकांविरुद्ध लढून ते काय साध्य करणार, असा प्रश्न पेण–सुधागड तालुक्यातील मतदार विचारत आहेत.

### जिल्हा वार्तापत्र

उद्धव ठाकरे आणि शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यातील चर्चेनंतर अलिबाग, पेण आणि पनवेल मतदारसंघ शेकापला देण्याचा निर्णय ठाकरे यांनी घेतला. एवढेच नाही अर्ज मागे घेणार नाहीत त्यांच्यावर कारवाईचा इशारा ठाकरे यांनी दिला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी अलिबागमधून जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी अर्ज मागे घेत शेकापच्या चित्रलेखा पाटील यांना वाट करून दिली; मात्र पेणमधून प्रसाद भोईर यांचा अर्ज कायम राहिला आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी अतुल म्हात्रे यांनी पत्रकार परिषद घेऊन ते महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला. त्यांच्या मागे बॅनरदेखील अधिकृत उमेदवार असाच होता. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे आणि उपनेते विजय कदम यांनी पत्रकार परिषद घेत प्रसाद भोईर हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला; मात्र त्यांच्यामागे महाविकास आघाडीचा बॅनर नव्हता. त्यामुळे आता महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शेकापचे अतुल म्हात्रे की शिवसेना ठाकरे गटाचे प्रसाद भोईर, असा प्रश्न मतदारसंघामध्ये विचारला जात आहे. दोन्ही बाजूंनी प्रचाराला वेग आला आहे. त्यामुळे पेण मतदारसंघामध्ये महाविकास आघाडासाठी कुणाला मतदान करायचे याबाबत स्पष्टता नाही. आता मतदानाला केवळ काही दिवस उरले आहेत. त्यामळे आता यावर केवळ पक्षप्रमुख उद्धव ठाकरेच पडदा टाकून हा राजकीय गोंधळ आणि मतदारांमधील संभ्रम मिटवू शकतात. प्रश्न आहे तो हे केव्हा घडणार?

## महाविकास आघाडीची अशीही खैरात


बीकेसी मैदानातल्या प्रचार सभेमध्ये राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे महायुतीवर अक्षरश: तुटून पडले. महायुतीपेक्षा आम्ही जनतेसाठी किती आणि काय काय करणार आहोत हे सांगताना शेवटी लाडकी बहीण योजने प्रमाणेच लाडका भाऊ योजनाही राहुल गांधींनी जाहीर केली. महाराष्ट्रातील महिलांसाठी मविआतर्फे त्यांनी महालक्ष्मी योजना जाहीर केली आहे. मविआ निवडून आली तर दर महिन्याला त्यांच्या खात्यात तीन हजार रुपये खटाखट जमा होणार आहेत. युवकांच्या उज्वल भविष्यासाठी युवकांच्या खात्यातही दर महिना चार हजार रुपये जमा होणार आहेत. नियमित



कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. फक्त यासाठी पैसे कुठून आणणार हे मात्र त्यांनी जाहीर केले नाही. मात्र हे ऐकताना लाडक्या बहीण योजनेच्या वेळी महाराष्ट्राच्या रिकाम्या पडलेल्या तिजोऱ्या एकाएकी भरभरून वाहू लागल्याचा आनंद महाराष्ट्रातील जनतेला झाला यात काही शंका नाही.

महाराष्ट्रातील निवडणुकींचे निकाल धक्कादायक असणार आहेत याबद्दल कुणाच्याच मनात शंका नाहीत. महायुतीतले तीन मोठे पक्ष आणि मविआमधले तीन मोठे पक्ष यांची विलक्षण झुंज या निवडणुकीमध्ये होते आहे. कोण जिंकणार, कोण हारणार याबरोबरच नंतरची गणिते कोणता पक्ष कशी जमवणार याचीही उत्सुकता सगळ्यांच्या मनात आहे.


## तोवर एकत्र येणार नाही...



काकांची आणि ताईंची साथ सोडून महायुतीमध्ये गेलेल्या अजित पवारांच्या पुढच्या खेळीविषयीही सर्वांना उत्सुकता आहे. ही राजकीय गणितं जुळवताना अजित पवार परत आले तर त्यांना पुन्हा सोबत घेणार का हा प्रश्न सुप्रियाताई सुळेंना विचारण्यात आला. दादा भाजपाबरोबर असेपर्यंत त्यांना परत घेणे कठीण आहे, असं त्या म्हणाल्या. कारण भाजपा आणि आमच्या विचारधारा खूप वेगळ्या आहेत. पण सत्तेसाठी कोणतीही विचारधारा कुठेही आणि कशीही मिसळून जाऊ शकते हे महाराष्ट्रातील जनतेने चांगलेच अनुभवले आहे.

## हुलकावणीचा खेळ

काय असेल ते असो, पण शरद पवार आणि पंतप्रधानपद याचा नेहमीच पाठशिवणीचा खेळ चालू असतो आणि अगदी थोडक्यात ते सर्वोच्च पद त्यांना हुलकावणी देते. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजीव गांधी यांची हत्या झाली. तेव्हा शरद पवारांनी राज्यातल्या ४८ पैकी ३८ जागा जिंकल्या. पी. व्ही. नरसिंहराव, अर्जुनसिंग यांच्या नावाबरोबर त्यावेळी पंतप्रधानपदासाठी शरद पवारांच्या नावाचीही चर्चा होती. पण अचानक सगळी नावे बाजूला टाकत पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले. त्यांच्या रिक्त स्थानावर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून सुधाकरराव नाईक यांची निवड झाली. पण बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये सुधाकरराव नाईकांना राजीनामा द्यावा लागला आणि शरद पवारांना पुन्हा महाराष्ट्रामध्ये परत यावे लागले. पवारांनी चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांना महाराष्ट्राचे चाणक्य, लोकनेते वगैरे पदव्याही मिळाल्या. पण पंतप्रधानपद गेले ते गेलेच.



# मतदान करण्यासाठी कटिबद्ध होत इतरांना प्रेरणा द्या : डॉ.रविंद्रकुमार सिंगल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

ज्या उत्साहाने नागपुरकरांनी स्वीप अंतर्गत वोटथॉन दौडमध्ये सहभाग घेऊन मतदान करण्याचा निश्चय केला आहे त्याचे रुपांतर आता शेजारच्यांनाही मतदान करण्यासाठी प्रवृत्त करण्यात व्हावे. प्रत्येक मतदारांमध्ये हा विश्वास देण्यासाठी युवकांनी पुढे यावे, असे आवाहन पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी केले. या ठिकाणी आपण मतदान करण्याची शपथ घेतली आहे. आता इतरांनी मतदान करावे अशी प्रत्येकांने प्रेरणा द्यावी, असे ते म्हणाले.




मतदारांच्या जागृतीसाठी स्वीप अंतर्गत यशवंत स्टेडियम येथे आयोजित वोटेथॉन रॅलीच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, नागपूरचे निवडणूक निरीक्षक भोर सिंग, सुनील कुमार, पवनकुमार सिंन्हा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

मतदान करणे हे प्रत्येक मतदाराचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. आपल्या राष्ट्रीय कर्तव्याचे पालन प्रत्येकाने केले पाहिजे. मतदाराचे प्रमाण किमान 75 टक्क्यांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ही प्रत्येक मतदारांची आहे. यासाठी प्रत्येक मतदाराने कृतिशील सहभाग घेतला पाहिजे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले. आपल्या घरी येणाऱ्या बीएलओंकडून आपले मतदान केंद्र लक्षात घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

व्होटथॉनच्या प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी उपस्थित सवार्ना मतदानाची प्रतिज्ञा दिली. एक स्वरात प्रतिज्ञा घेत उपस्थितांनी आम्ही मतदान करणार असा संदेश दिला. भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वीप आयकॉन व दिव्यांग खेळाडू श्रीमती सुवर्णा राज यांनी दिव्यांग व ज्येष्ठ मतदार यांच्या मतदानासाठी उत्तम सोयीसुविधा करून देत असल्याचे सांगितले. निवडणूक निरीक्षक सुनील कुमार यांनी विधानसभा निवडणुकीत नागपूरकर रेकॉड ब्रेक कामगिरी करीत मतदान करतील अशी अपेक्षा व्यक्त केली. तर निवडणूक निरीक्षक पवनकुमार सिंन्हा यांनी वोटथॉनतून निर्माण झालेला उत्साह मतदानाच्या दिवसापर्यंत तसाच कायम ठेवावा आणि मतदानासाठी अधिकाधिक संख्येत मतदान करावे, असे आवाहन केले. वोटथॉन मतदार जनजागृती दौड स्पर्धेत मतदार विद्यार्थी, पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या महिला जवान, सर्व सामान्य नागरिक यांच्यासह शासकीय व खाजगी क्षेत्रातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी लक्षणीय सहभाग नोंदवला.

नागपूर शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करावे याकरिता ज्येष्ठ संघटनेच्या वतीने आवाहन करण्यात आले. अमित स्पोर्ट अकादमीच्या योगपटूंनी चित्तथरारक योग प्रात्यक्षिक सादर करीत मतदान करावे असा संदेश दिला. महिलाः प्रथमः अंजली मडावी, द्वितीयः रिता तरारे, तृतीय : सुचिता वडामे, चतुर्थः निकिता साहू, पाचः रितू मडावी पुरुष प्रथमः गौरव खडटकर, द्वितीयः मनीष पथे, तृतीय : अभय मस्के, चतुर्थः रोहित राहंगडाले पाचः मोहित कोरे लहान मुलांचा गट मुलंः सौरभ भट्ट (७ वर्ष), लक्ष पटेल(८ वर्ष) अद्वित भोसले(९ वर्ष) मुलीः आर्या टाकोने(६ वर्ष), नव्या बाराई(१० वर्ष),श्रावणी लसने (१२ वर्ष)ज्येष्ठ नागरिकःदिवाकर भोयर(७९ वर्ष), दामोधर वानखेडे(६५ वर्ष) संतोष तायडे(४७ वर्ष) महिला श्रीमती रेणू सिद्धू (४९ वर्ष ) फॅन्सी ड्रेस- संतोषी धूम, दिव्या घुमने, जीवा सूर्यवंशी, रुद्र टाकोने, सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, नागपूर जिल्हापरिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपील कलोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलास घोडके, समाज कल्याण सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, प्रकाश वराडे, गणेश राठोड, शिवजय देशमुख, डॉ. गजेंद्र महल्ले, शिक्षणाधिकारी साधना सयाम, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, यांच्यासह मनपा, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# मविआचा जाहीरनामा म्हणजे अफवा : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज महविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात महाविकास आघाडीकडून पाच हमी देण्यात आल्या आहेत. मात्र, मविआचा जाहीरनामा अफवा असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. ते नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा जाहीरनामा हा अफवा आहे. कारण काँग्रेस विकास करणार नाही, त्यामुळे त्यांच्या जाहीरनाम्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. काँग्रेस लाडकी बहीण योजनेसाठी 3 हजार रुपये देणार असल्याचे म्हणत आहे. पण काँग्रेसवाले खोटारडे आहेत. ही योजना बंद करण्यासाठी ते कोर्टात गेलेत. आम्हाला असल्या योजना परवडणार नाहीत, असे विजय वडेट्टीवारांसह अनेक नेते बोलले आहेत आणि आता तेच योजना परत आणत आहेत, असा हल्लाबोल बावनकुळे यांनी केला. तर आमचे बजेट तयार असून रस्ते, वीज, पाण्यासाठी आम्ही केंद्राकडून पैसे आणू, असे ते म्हणाले.

बावनकुळे यांनी राहुल गांधी यांनाही टोला लगावला आहे. राहुल गांधी यांचा पायगुण चांगला नाही. तर मोदीजी हे विश्व गौरव पुरुष आहेत. कोणाचा पायगुण चांगला आहे, हे हरियाणा आणि देशाने पाहिले आहे. मोदी हे देशात विकासासाठी येणार योगपुरुष असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप खासदार धनंजय महाडिक यांनी महिलांबाबत केलेल्या वादग्रस्त विधानावरही प्रतिक्रिया दिली आहे. महिलांबाबत असे बोलणे चुकीचे आहे. त्यांनी त्या वक्तव्याचे खंडन करून माफी देखील मागितली आहे. भाजपच्या नेत्यांनी यापुढे अशी वक्तव्ये करू नयेत, असा सल्ला बावनकुळे यांनी भाजपच्या नेत्यांना दिला आहे.

महाविकास आघाडीने रविवारी महाराष्ट्र निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. टश्अ ने त्याला 'महाराष्ट्रनामा' असे नाव दिले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, महाराष्ट्राच्या विकासाचे पाच स्तंभ आहेत. महाराष्ट्राचा विकास आणि प्रगती कृषी, ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, शहरी विकास, पर्यावरण आणि लोककल्याण यावर आधारित असेल. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने रविवारी आपला जाहीरनामा (संकल्प पत्र) प्रसिद्ध केला. गृहमंत्री अमित शहा यांनी स्वतः जाहीरनामा जाहीर केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 25 लाख नोकऱ्या, महाराष्ट्राचा संपूर्ण विकास, शेतकऱ्यांसाठी भावांतर, कर्जमाफी आणि महिलांना 2100 रुपये देण्याचा आम्ही संकल्प केला आहे.

# स्नेह मिलन सोहळा संपन्न




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

सकल माळी समाजा तर्फे दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्र महायुतीचे अधिकृत उमेदवार भाजपा शिवसेना रिपाई (आ) बरीएमचे मोहन गोपाळराव मते यांना सकल माळी समाजाने पाटिंबा जाहीर केला.

दक्षिण नागपूर समस्त माळी समाजाचा स्नेह मिलन कार्यक्रमात ९ नोव्हेंबर ला स्मृती मंगल कार्यालय, शारदा चौक, आशिर्वाद नगर येथे संपन्न झाला. याप्रसंगी मार्गदर्शन करण्यासाठी माजी आमदार अशोकराव मानकर, माजी नगरसेविका सुनंदा गुलाबराव नाल्हे, स्वाती आखतकर, ज्योती देवघरे तसेच गुलाबराव नाल्हें, भारतीय जनता पार्टी दक्षिण प्रभारी सुरेशजी आर्य, माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रवींद्र अंबाडकर, माळी महासंघ नागपूर अध्यक्ष शंकरराव चौधरी, अखिल भारतीय माळी महासंघ महासचिव शिवराम गुरूनुले, सावता सोसायटीचे अध्यक्ष निलय चोपडे, मुकुंदराव पोटदुखे, विनीत गणोरकर तसेच महेंद्र फरकाडे, छत्रपती सुफले, अनिल चरपे, प्रदीप सोनुले, राजेंद्र पाटील, राजेश दारोकर, प्रशांत तिजारे, डॉ. राजेश कुऱ्हाडे, डॉ. बाळ ढाकूलकर, सचिन ठाकरे, विजया अंबाडकर, प्रणिता लोखंडे,सौ उज्वला फुलारी, सिंधू कांडलकर, प्रमिला वरले, सौ. रेखा झाडे इत्यादी याप्रसंगी उपस्थित होते.

# खंजीरसह गुंडास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने गस्तीदरम्यान एका गुंडास खंजीरसह फिरताना अटक केली. रितिकेश उर्फ रितिक विजय वाघमारे (20) रा. रिपब्लिकननगर, इंदोरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

शुक्रवारी सायंकाळी युनिट एकचे पथक जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान एक गुन्हेगारी प्रवृत्तीचा तरुण सुगतनगर चौकातील अभिषेक वारसेच्या पानठेल्याजवळ उभा असून त्याच्याजवळ खंजीर असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ तेथे पोहोचून रितिकला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ एक लोखंडी खंजीर मिळाला. अटक करून खंजीर जप्त करण्यात आला.

# सेवा केंद्र संचालकाची ३० लाखांनी फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

मोबाईल सेवा केंद्राच्या संचालकाची 30 लाख रुपयांनी फसवणूक करणाऱ्या व्यवस्थापकासह तिघांविरुद्ध अंबाझरी पोलिसांनी गुन्हा दाखल करून 2 आरोपींना अटक केली आहे. व्यवस्थापक प्रभाकर ढोले (43) रा. मानेवाडा, हर्षल घागरे (22) रा. पांढराबोडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. जरीपटका येथील रहिवासी फियार्दी नानकराम चेलवानी (43) यांचे गोकूळपेठ येथे नायसा इन्फोटेक धरमपेठ, या नावाने एका नामांकित कंपनीचे मोबाईल सर्व्हीस सेंटर आहे. याठीकाणी आरोपी प्रभाकर हा व्यवस्थापक तर हर्षल आणि सुजीत खवसी (25) रा. अजनी हे कर्मचारी होते. सेंटरमध्ये मोबाईल दुरुस्ती व मोबाईलशी संबधीत इतर कामांसाठी ग्राहक येतात. संचालकाला अंधारात ठेवून आरोपी ढोले याने हर्षल आणि सुजीत यांच्याशी संगणमत केले. ग्राहकांनी खरेदी केलेले सुटे भाग किंवा दुरुस्तीतून मिळालेले पैसे कंपनीच्या खात्यात जमा करण्याऐवजी फोन पे द्वारे स्वतःच्या खात्यात जमा करीत होते. कॅशमध्ये पेमेंट करणाऱ्या ग्राहकांना आरोपी पावतीही देत नव्हते. आरोपींनी कंपनीला चेलवानी यांच्या नावाने ईमेल करीत व्यवसाय तोट्यात असल्याची बतावणी करीत सुरक्षा ठेव म्हणून जमा केलेली रक्कमही स्वतःच्या खात्यात मागून घेत 30 लाख रुपयांचा चुना लावला. हा प्रकार मागील दीड वर्षांपासून सुरू होता.

व्यवसाय तोट्यात चालल्याचे पाहून चेलवानी यांनी आपल्या भावाला सर्व्हीस सेंटरची जबाबदारी दिली. दरम्यान एका ग्राहकाने 8 हजार रुपये दिले. कर्मचाऱ्याने ती रक्कम कंपनीच्या खात्यात जमा न करता स्वतःच्या फोन पे मध्ये घेतली. चेलवानी यांच्या भावाला ही बाब लक्षात आल्याने त्याने कर्मचाऱ्यांची चौकशी केली असता हा सर्वप्रकार व्यवस्थापकाच्या सांगण्यावरुन सुरू असल्याचे समजले. ऑडिटमध्ये आरोपींनी जवळपास 30 लाख रुपयांचा चुना लावल्याचे उघडकीस आले. प्रकरणाची पोलिसात तक्रार करण्यात आली.


## परिशिष्ट– 43
## (प्रकरण 3, परिच्छेद 3.8)
## नमूना सी–1

## फौजदारी गुन्ह्यासंदर्भातील घोषणापत्र

**(मा. सर्वोच्च न्यायालयाने विनंती याचिका (दिवाणी) क्र.536/2011 पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन व इतर वि. युनियन ऑफ इंडिया व इतर या प्रकरणी दि. 25.09.2018 या न्यायनिर्णयानुसार)**

**उमेदवाराचे नाव व पत्ता** – दुनेश्वर सुर्यभान पेठे, वय 55 वर्षे प्लॉट नं. 25, हीवरी ले आउट, नागपूर
**राजकीय पक्षाचे नाव** – नेशनलिस्ट कांग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)
**निवडणुकीचे नाव** – महाराष्ट्र विधानसभा 2024
**मतदारसंघाचे नाव** – 54 पूर्व नागपूर

**मी दुनेश्वर सुर्यभान पेठे, उपरोक्त निवडणुकीचा उमेदवार जनतेच्या माहितीकरिता खालीलप्रमाणे माझेविरुद्ध असलेल्या फौजदारी प्रकरणासंदर्भात माहिती जाहीर करतो.**

| अनु. क्र. | प्रलंबीत फौजदारी प्रकरणे | | | सिद्धदोषी ठरविण्यात आलेल्या फौजदारी प्रकरणाचे विवरण | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायालया चे नाव | खटला क. खटल्याची स्थिती व | अंतर्गत असलेल्या संबंधीत अधिनियमांच्या संहितेची कलमे | न्यायालया चे नाव | ज्याकरिता सिद्धदोषी ठरविण्यात आलेल्या अपराधे संक्षिप्त विवरण |
| 1 | जे.एम. एफ.सी.–3 | 777/2023 (कोर्ट पेन्डिंग) | 147, 148, 143 भा.द.वि. | निरंक | निरंक |
| 2 | निरंक | 333/2024 (तपासावर) | 126/2, 132, 190, 191/2, 192, 221, 223 (ए), बी.एन.एस. | निरंक | निरंक |

उमेदवाराची सही



**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

**Name and address of candidate : DR. NITIN RAUT, 24, GARDEN LAYOUT, BENZONBAGH, NAGPUR-440004**

Name of Political Party : **INDIAN NATIONAL CONGRESS**

*(Independent candidates should be write "Independent" here)*

Name of Election : **MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY (VIDHAN SABHA)**

* Name of Constituency : **57-NORTH NAGPUR (SC)**

I **DR. NITIN KASHINATH RAUT,** a candidate for the abovementioned election declaring for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | District Judge-16 and additional Sessions Judge, Nagpur & In Court of District Judge 16 and Add. Session Judge, Nagpur | Session case No. 89/2023, Case No. RCC-0300145-2008 | Under process | Alleged offence are registered U/s. 143-Punishment for being member of unlawful assembly, 147-Punishment for rioting, 148-Rioting, Armed with deadly weapon, 149-Offence Committed by any member of any unlawful assembly in prosecution of the common object of that assembly, 323-Punishment for voluntarily causing hurt, 332-Voluntaritly causing hurt to deter public servant from his duty, 333-Voluntarily causing grevious hurt to deter public servant from his duty, 353-assault or criminal force to Deter public servant from discharge his duly, 427-Mischief causing damage to the amount of fifty rupees of IPC & U/s. 135-Disobedience of an order lawfully made under section 37, 39 or 40 of BP Act or abets the Disobedience thereof 3-Mischief causing damage to public property 7-Molesting a person to prejudice of employment or business |
| 2 | 12th Jt. C.J.J. Division & JMFC, Nagpur | S.S.C. No. 315285/ 2009 | Under process | Alleged Offence are registered U/s. 171, Wearing grab or carrying token used by public servant U/s. 188-Disobedience to order promulgated by public servant 134- Maharashtra Police Act-Penalty for contravention of Rule etc., under sec. 36 |
| 3 | Search on the official website of court but not found | Search on the official website of court but not found | Under process | Alleged Offence are registered U/s. 135-Disobedience of an order lawfully made under section 37, 39 or 40 of PB Act or Abets the disobedience thereof |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sl. No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| NIL | NIL | NIL | NIL |
| NIL | NIL | NIL | NIL |
| NIL | NIL | NIL | NIL |

PLACE : NAGPUR
DATE : 10/11/2024

SD/-
DR. NITIN KASHINATH RAUT

# राज्यात 'दळभद्री' विचारांच्या नेत्यांचे अमाप पीक

**'मला महाराष्ट्राचा चेहरा स्वच्छ व साफ करायचा आहे' असे वाक्य शरद पवारांनी काढल्यावर 'आम्हाला महाराष्ट्राचा चेहरा तुमच्या चेहऱ्यासारखा करायचा नाही' असे भयानक वाक्य कोण बोलू शकत असेल, तर त्याचे उत्तर भाजपमधील काही वाचाळ नेते असे असले, तरी त्यातील सर्वोच्च नाव म्हणून सदाभाऊ खोत यांचेच नाव घ्यावे लागेल. यांना देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेवर घेऊन आमदारकी दिली त्यासाठीच. महाराष्ट्रातील सर्वात वाचाळ नेते म्हणून ओळख असलेल्या सदाभाऊ खोत यांना मांडीवर बसवून देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाचा पुरता खेळखंडोबा करून टाकला आहे.**






जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६११४२०

शरद पवारांवर अतिशय खालच्या पातळीची टिपणी खोत करीत करताना व्यासपीठावर गोपीनाथ पडळकर मनमुराद हसताना पाहून अक्षरशः किळस येत होती. तर चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटवून देवेंद्र फडणवीस जणू खोतांच्या या वक्तव्याची वाटच पाहत होते असे दिसले. या घटनेमुळे महाराष्ट्रात राजकारणाचा पार चोथा झाला असे म्हटले जात असले, तरी त्यास कारणीभूत कोण आहे याची माहिती घराघरात पोहोचली जात आहे. याचा सर्वात मोठा परिणाम बारामती मतदारसंघात होणार आहे. याची जाणीव महायुतीच्या सर्वोच्च नेत्यांना जरूर आहे. परंतु ते देखील याचीच वाट पाहत होते की काय, असे वाटू लागले आहे.

या सर्व प्रकरणात अजितदादा पवारांची मोठी गोची झाली असली, तरी ते आता काय करू शकतात? कारण त्यांच्या भात्यातील बाण केव्हाच सुटला आहे. तो मागे येणे शक्य नाही. त्यामुळे फक्त नाराजी व्यक्त करून त्यांना गप्प बसणे भाग पडले आहे. त्यांची नाराजी लक्षात घेवून खोतांनी दिलगिरी व्यक्त केली असली, तरी तो भाजपच्या रणनितीताच एक भाग असतो. खरंतर गेली दहा वर्षात या राज्यात राजकारण, समाजकारण करणाऱ्यांपेक्षा वाचाळ व कुचाळ विचारांचे नेतेमंडळींचे अमाप पीक आले आहे. त्यांना कोणीच वडीलधारी व सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेता नाही की जो त्यांचे कान पकडून शकेल.

दुसरे असे की, शरद पवारांच्या राजकारणावर बरच काही बोलता येईल. पण विरोधकांवर टीका करण्यासाठी आपल्या पन्नास वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांना कधी सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर, मोहित कुंभोज, प्रवीण दरेकर, गुणरत्न सदावर्ते यांच्यासारख्या तत्सम विकृत लोकांची गरज पडली नाही. दस्तुरखुद्द पवारांनी सुद्धा अशा लोकांना कधी खतपाणी घातले नाही. अनेकांशी लढले, भिडले पण स्वतःच्या हिमतीवर, विद्यार्थी चळवळीत आंदोलन करताना रामदास आठवले त्यांना दिसले, परिषदेवर घेतले, लोकांमधूनही निवडून आणले. ना. धो. महानोर सारखे साहित्यिक, कवी असे दिग्गज लोक विधान परिषदेत बसविले. 'उपरा'कार लक्ष्मण माने असोत की कवी रामदास फुटाणे अशी अनेक दर्जेदार माणसे शरद पवारांनी परिषदेवर घेतली. आज परिषदेत पाहिले तर काय ? प्रविण दरेकर, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, गोपीचंद पडळकर, चित्रा वाघ ? एक नक्की की, देवेंद्र फडणवीसांचा चेहऱ्यामागे एक धूर्त राजकारणी दडलेला आहे, ज्यांची पद्धतच अशी की, विशिष्ट लोकांना पुढं करून फक्त विकृतपणे मजा पाहण्याची आहे.


जितकी विकृती करणाऱ्या अन् बोलणाऱ्यांमध्ये असते, तितकीच विकृतीला बळ देणाऱ्यांच्या मनात असते. कोणत्याही माणसाचे मूल्यमापन करताना त्याच्या जवळची लोकं पहावीत, यावरून त्या व्यक्तीचे विचार कळतात. देवेंद्र फडणवीसांना इतरांवर टीका करायच्या खूप मर्यादा आहेत, म्हणून त्यांनी असले 'बगलबच्चे' पाळून ठेवले आहेत.

खरं म्हणजे देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्राची राजकीय संस्कृती नासवून ठेवली आहे. त्यांची ही बेताल मंडळी सत्तेतून हाकलल्याशिवाय महाराष्ट्रातील राजकीय वातावरणात शांतता प्रस्थापित होणार नाही, असे आता वाटू लागले आहे. राजकारणातील गढूळ वातावरण स्वच्छ करण्यासाठी लोकांना निदान त्यांची बेताल वक्तव्ये ऐकायची नसेल तर बदल करावाच लागेल. अशांना महाराष्ट्राच्या राजकारणातून घालवण्याची संधी जनतेने सोडूच नये. तशी पवारांचीही बातच न्यारी. त्यांच्याशी संघर्ष करताना अनेकांच्या पिढ्या संपल्या किंवा राजकारणातून हद्दपार झाल्या. परंतु पवार आहे त्याच ठिकाणी ठामपणे उभे आहेत.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांवर राजकारणाच्या या शह काटशहाच्या खेळात ते प्रवीण आहेत. त्याची प्रचिती अनेक वेळा त्यांच्या विरोधकांना आलेली आहे. त्यामुळे या जिल्हा पातळीवरच्या नेत्यांनी गपगुमान पडले पाहीजे, अशी बेताल वक्तव्य सुरू होत असताना कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर टाळ्या व शिट्ट्या वाजवत असतात. कारण एक नेता दुसऱ्या नेत्याच्या शारीरिक व्यंगावर टीका करून चिंधड्या उडवीत असताना हे कार्यकर्ते मोठ्याने चित्कारत असतात. हा प्रकार सर्वच राजकीय पक्षात असतो. पण या कार्यकर्त्यांनी एक लक्षात घेतले पाहिजे की, या प्रकरणात त्यांना मिळते तरी काय? अलिकडेच दोन बातम्या आल्या आहेत आणि त्या दोन्ही समजून घेतल्या तर खूप काही 'खजाना' मिळेल. पहिली बातमी अशी की, बिहारमधील भागलपूरमध्ये मशिदीवर चढून भगवा झेंडा फडकवणाऱ्या शिवम कुमारला अटक करण्यात आली आहे.

दुसरी बातमी अशी की, अरुण जेटली यांचा मुलगा रोहन जेटली लवकरच बीसीसीआयचा सचिव होणार आहे. या दोन बातम्या आणि या देशातील राजकारणाचे संपूर्ण सत्य लोकांच्या समोर येत आहे. एका गरीबाचा मुलगा भगवा घेऊन मशिदीवर चढतोय, तर त्याचंच राजकारण करणाऱ्यांची मुलं बीसीसीआयपर्यंत पोहोचत आहेत. यातून तरी कार्यकर्त्यांनी बोध घ्यावा की नाही?

# शिक्षण दिन



आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती.

अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता.

शिक्षण पूर्ण झल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली.

काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत.

महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही.

त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले.

मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोड्र्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात "मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली." १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# शिक्षणाशिवाय व्यक्ती विकास अशक्यप्राय!

भारतात स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले शिक्षणमंत्री असलेले मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती म्हणून दरवर्षी 11 नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा केला जातो. 11 नोव्हेंबर 2008 पासून हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने घेतला होता. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी शिक्षणमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. 11 नोव्हेंबर 1888 रोजी जन्मलेले अबुल कलाम गुलाम मुहियुद्दीन अहमद बिन खैरोद्दीन अल-हुसैनी आझाद हे भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते, लेखक आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. मौलाना आझाद यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही काम केले व त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान बहुमोल आहे.

---

एक अग्रणी विचारवंत आणि विचारवंत म्हणून स्वातंत्र्यलढ्यातील त्यांची भूमिका प्रेरणादायी आहे. त्यांना शिक्षण क्षेत्राची आवड होती आणि त्यांनी सामाजिक बंधुत्व वाढवण्याचे काम केले. आझाद हे त्या काळातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक होते आणि त्यांचा समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेवर गाढ विश्वास होता.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते भारत सरकारचे पहिले शिक्षणमंत्री झाले. राष्ट्रीय शिक्षण दिनाचा पहिला सोहळा विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते झाला. या दिवशी विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या विविध पैलूंबद्दल त्यांचे विचार मांडतात.

विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या सर्व पैलूंशी देशाची बांधिलकी सांगण्यासाठी एकत्र येतात. तसेच विविध शाळांमध्ये अनेक माहितीपूर्ण आणि आनंददायक चर्चासत्रे, निबंध परिसंवाद, भाषण, पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि रॅली आयोजित करून साजरा केला जातो. अबुल कलाम आझाद यांनी भारताच्या शिक्षण व्यवस्थेत केलेल्या सर्व मूलभूत योगदानांना राष्ट्रीय शिक्षण दिन श्रद्धांजली अर्पण करतो.

1920 मध्ये यूपीमधील अलीगढ येथे जामिया मिलिया इस्लामिया स्थापन करण्यासाठी फाउंडेशन कमिटीचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. 1934 मध्ये त्यांनी विद्यापीठाचा परिसर अलीगढहून नवी दिल्ली येथे हलवण्यातही मदत केली. आता कॅम्पसच्या मुख्य गेटला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

पहिले भारतीय शिक्षणमंत्री म्हणून, आझाद यांचे स्वातंत्र्योत्तर भारतातील मुख्य लक्ष ग्रामीण गरीब आणि मुलींना शिक्षण देणे हे होते. 16 जानेवारी 1948 रोजी अखिल भारतीय शिक्षणावरील परिषदेला संबोधित करताना ते म्हणाले, ह्रआपण क्षणभरही विसरता कामा नये, किमान मूलभूत शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे, ज्याशिवाय तो एक नागरिक म्हणून आपले कर्तव्य पूर्ण करू शकत नाही.

आपल्या कार्यकाळात त्यांनी देशातील काही उत्तम शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या शिक्षण विभागाची स्थापना 1951 मध्ये पहिली भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि 1953 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली. त्यांच्या कार्यकाळात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यांचा वारसा लक्षात ठेवण्यासाठी अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने 1989 मध्ये मौलाना आझाद एज्युकेशन फाउंडेशनची स्थापना केली.

मनुष्यबळ विकास मंत्रालय दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिनासाठी वेगळी थीम निश्चित केली जाते. देशाच्या शैक्षणिक क्षेत्राची उद्दिष्टे आणि त्या क्षेत्रातील प्रगती लक्षात घेऊन ही थीम निश्चित करण्यात आली आहे. थीमनुसार दिवसभराचे कार्यक्रम आखले जातात. यावर्षी सुध्दा सोमवार, 11 नोव्हेंबर रोजी शिक्षण दिन साजरा केला जाणार आहे. या वर्षीची थीम इंब्रेसिंग इनोव्हेशन आहे 2022 ची थीम चेंजिंग कोर्स, ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन होती. ही थीम शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची आणि ती सध्याच्या काळाशी जुळवून घेण्याची गरज दर्शवते.

आझाद यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले होते. राष्ट्रीय शिक्षक दिन साजरा करण्याचा सर्वात मोठा उद्देश म्हणजे लोकांना शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व याची जाणीव करून देणे. दरवर्षी 11 नोव्हेंबर रोजी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

मौलाना अबुल कलाम आझाद यांनी 15 ऑगस्ट 1947 ते 2 फेब्रुवारी 1958 पर्यंत देशाचे शिक्षणमंत्री म्हणून काम केले आणि 22 फेब्रुवारी 1958 रोजी दिल्लीत त्यांचे निधन झाले. यासाठी त्यांना 1992 मध्ये सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान असलेल्या भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करणे ही मौलाना अबुल कलाम आझाद यांना श्रद्धांजली आहे. मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

# पैसे वाटा, निवडणूक जिंका..

महाविकास आघाडी सरकारने आपल्या घोषणापत्रात पाच गॅरंटी दिल्या आहेत. तसेच प्रत्येक परिवारास वषार्ला तीन लाख रुपये मिळणार आहे. महिलांना मोफत बस प्रवास देण्यात येणार आहे. लाडकी बहीण योजनेऐवजी महालक्ष्मी योजना आणणार असून त्यातून महिलांना तीन हजार रुपये देणार आहे. शेतकऱ्यांचे 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करणार आहे. तसेच बेरोजगार युवकांना दर महिन्याला चार हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. काँग्रेस नेते आणि अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हस्ते महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला.

**काय आहे काँग्रेसचे पंचसूत्री?**

महालक्ष्मी योजना - महिलांना दर महिन्याला 3 हजार रुपये आणि महिला व मुलींसाठी मोफत बस सेवा देण्यात येईल.

कृषी समृद्धी - या योजनेत शेतकऱ्यांचे 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होईल. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

कुटुंब रक्षणासाठी विमा - 25 लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा देण्यात येणार आहे.

युवकांना मदत - बेरोजगार तरुणांना दर महिन्याला 4 हजार रुपयांपर्यंतची मदत देण्यात येणार आहे.

समानतेची हमी - जातनिहाय जनगणना करणार आणि आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा हटवणार आहे.

जातनिहाय जनगणना आम्ही लोकांमध्ये विभाजन करण्यासाठी करत नाही, असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले. महाविकास आघाडीचा पुढील शंभर दिवसांचा कार्यक्रम यावेळी जाहीर करण्यात आला. त्यात महिलांना सहा गॅस सिलेंडर देण्यात येणार आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी शक्ती कायदा लागू करणार आहे. एमपीएससीचे वेळापत्रक जाहीर करुन ४५ दिवसांत निकाल लावण्यात येणार आहे.

दरम्यान, महायुती सरकारने आणलेली लाडकी बहिण योजना महिलांचे भले करण्यासाठी नव्हे तर मतांवर डोळा ठेवून आणली आहे. अशा अनेक योजनांसाठी लागणारा निधीच मुळात सरकारकडे नाही. योजनांवर लागणारा निधी उभारण्यासाठी कर्ज काढायचे, कर वाढवायचे आणि लूट करायची, एवढेच धंदे सुरू आहेत. सत्ताधारी पक्षांवर टीका करणारी काँग्रेसही आता पैशाची उधळपट्टी करण्याच्याच योजना सांगत आहे.

# रिकाम्या पोटी कढीपत्ता खा.. आजार दूर पळवा..



रिकाम्या पोटी कढीपत्ता खाल्याने अनेक आजारांपासून मुक्ती मिळते. कढीपत्यात आढळणारे अँटिऑक्सिडंट, जीवनसत्वे आणि खनिजे शरीरासाठी फायदेशीर आहे. सकाळी रिकाम्या पोटी कढीपत्ता खाल्यास त्याचे अनेक चमत्कारी फायदे होतात.

स्वयंपाक घरात उपलब्ध असणाऱ्या गोष्टींनी अनेक आजार बरे होतात. स्वयंपाक करतांना कढीपत्त्याचा वापर फक्त चव आणि सुगंध वाढवण्यासाठीच केला जातो. पण अनेकदा आपल्याला त्याच्या आरोग्यदायी गुणधर्मांची माहिती नसते.

रिकाम्या पोटी कढीपत्ता खाल्याने अनेक आजारांपासून मुक्ती मिळते. कढीपत्त्यात आढळणारे अँटिऑक्सिडंट, जीवनसत्वे आणि खनिजे शरीरासाठी फायदेशीर आहे. सकाळी रिकाम्या पोटी कढीपत्ता खाल्यास त्याचे अनेक चमत्कारी फायदे होतात.

**हृदयाचे आरोग्य सुधारते:**
कढीपत्त्यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट आणि फायबर कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. रक्तातील खराब कोलेस्ट्रॉल यामुळे कमी होते आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही कमी होतो.

**केस आणि त्वचेसाठी फायदेशीर:**
कढीपत्त्यामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटी इम्प्लिमेंटरी गुणधर्म असतात ज्यामुळे त्वचा स्वच्छ होते. कढीपत्ता नियमितपणे खाल्ल्याने केस मजबूत होता आणि त्वचा स्वच्छ होते. पांढरे केस आणि केस गळती थांबवण्यासाठी कढीपत्त्याचा वापर केला जाऊ शकतो.

**पचन समस्येवर गुणकारी:**
कढीपत्त्यामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते ज्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. रिकाम्या पोटी सकाळी कढीपत्ता खाल्ल्याने पोटदुखी, गॅस आणि बद्धकोष्ठते सारख्या समस्यांपासून आराम मिळतो कढीपत्ता खाल्ल्यामुळे ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

**वजन कमी करण्यास मदत करते:**
कढीपत्त्यामध्ये आवश्यक पोषक घटक आणि फायबर असतात ज्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी हे मदत करतात आणि चयापचय गतिमान करतात त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**डोळ्यांसाठी फायदेशीर:**
विटामिन ए कढीपत्त्यात मुबलक प्रमाणात असते जे डोळ्यांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. दृष्टी संबंधित इतर समस्या आणि मोतीबिंदू दूर ठेवण्यास देखील यामुळे मदत होते.

**असे करा कढीपत्त्याचे सेवन**
कढीपत्त्याची पाच ते सहा पाने सकाळी उपाशीपोटी खाल्लयाने त्याचा फायदा होतो. एक ते दोन महिने सतत याचे सेवन केल्याने त्याचे फायदे तुम्हाला मिळतील. जर तुम्हाला चवीला हे कडू वाटत असेल तर एक ग्लास पाण्यात सोबत देखील ही पाने खाऊ शकता.

## अशोकायन

### निवडणुका

जात्याच्या पात्यात भौ
दाणेच जातात भरडले
इलेक्शन असो कोणतेही
कार्यकर्तेच जातात रगडले..

नोट आणि व्होटचं
असतं अदृश्य नातं
इलेक्शनच्या काळात
त्यांच प्रेम उफाळुन येतं ..

गेम व इलेक्शन मध्ये
हार किंवा जीत निश्चीत
खिळाडु वृत्तीने स्विकारा
नका करु वातावरण दुषित ..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## वाचक लिहितात

### अधोगतीच्या दिशेने वाटचाल

महायुती सरकार साधारणतः अडीच वर्षापासून राज्यात सत्तेत आहे. जून 2022 मध्ये एकनाथ शिंदे यांनी बंड केले आणि भाजपासोबत सत्ता स्थापन केली. पुढे वर्षभरानंतर अजित पवार याच सत्तेचे हिस्सा बनले. पक्ष फोडाफोडी, गद्दारी, बंड, खोकेबाजी हे या राज्यातील मतदारांना पटल्याचे दिसत नाही. कदाचित त्याचाच परिणाम म्हणून काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला पराभवाचा सामना करावा लागला.

या कार्यकाळात राज्याची अवस्था बिकट झाली असे म्हणायला वाव आहे. केवळ तोंडाच्या वाफा तेवढ्या सोडून, विकासाचा ढोल बडवला जात आहे. विधानसभा निवडणुकी आपले काही खरे नाही म्हणून, महायुती सरकारने मध्य प्रदेशात सुरू असलेली लाडकी बहिण योजना महाराष्ट्रात लागू केली. लाडका भाऊ आणि आणखी काय काय घोषणा सुरू आहेत, केल्या जाणार आहेत, त्यांनाच लखलाभ.

परंतु, या अशा फुकटगिरीमुळे लोकांची क्रयशक्ती कमी करणे, त्यांना आळशी बनविणे, फुकटचे खायची सवय लावून देणे असलेच प्रकार सुरू आहेत. मोफत किंवा 2 रूपये किलोने धान्य देण्याच्या योजनेत किती लोक हे धान्य वापरतात आणि किती विकतात? याचा शोध घेतल्यास बरेच काही समोर येईल.

आता महिन्याला 1500 रूपये मिळतात म्हणून कोण महिला खुश होणार नाहीत. परंतु, अशा योजनांवर उधळला जाणारा पैसा हा कोणाच्या खिशातून जातो? सामान्य करदात्यांच्याच ना.

निधीची कमतरता आधीच आहे. त्यात सरकार कर्ज काढून सण साजरे करू लागले आहे. एकीकडे खिरापत वाटायची आणि दुसरीकडे करवाढ करायची, महागाई वाढवायची, महिनोमहिने अनुदान अडकवायचे, शिष्यवृत्ती थांबवायची, पगार थांबवून ठेवायचे? हा काय प्रकार आहे. अशा फुकट्या योजना अधोगतीकडेच नेणार आहेत.

• सौ. अर्चना देशमुख, नागपूर.

# पैंटोमैथच्या भारत व्हॅल्यू फंडने हल्दीराम भुजियावाला मध्ये २३५० दशलक्ष रुपयांची गुंतवणूक

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १० : कोलकाता स्थित हल्दीराम भुजियावाला लिमिटेडने पैंटोमैथच्या भारत व्हॅल्यू फंडने (CAGR)कंपनीमध्ये अल्पमत हिस्सा घेण्यासाठी केलेल्या २३५०दशलक्ष रुपयांच्या गुंतवणूकीसह त्यांच्या प्रायव्हेट प्लेसमेंट फेरीच्या यशस्वी समाप्तीची घोषणा केली आहे. हल्दीराम भुजियावाला लिमिटेड त्यांच्या उत्पादनांची विक्री प्रभुजीब्रँड अंतर्गत करते.

भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असलेली स्नॅक्स बाजारपेठ आर्थिक वर्ष २४ मध्ये अंदाजे ४२६ अब्ज रुपये होती. आर्थिक वर्ष ३२ पर्यंत ११% चा नोंदवून ती अंदाजे ९५५ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचेल. लक्षणीय बाजार पेठीय हिस्सा असलेल्या बाजारातील संघटित कंपन्यांचे या विकासात प्रमुख योगदान असेल. गुणवत्ता, सोय आणि सुरक्षिततेच्या मानकांविषयी असलेली दृढ बांधिलकीयांसहउत्पादनाच्या विविधतेवर त्यांचे सातत्याने लक्ष केंद्रित असल्यामुळे त्यांना पुढील विस्तारासाठी स्थान मिळेल.

हल्दीराम भुजियावाला लिमिटेडला स्नॅक्स आणि चविष्ट चटपटीत पदार्थांच्या उद्योगाचा वर्षांहून अधिक वारसा आहे. कंपनी त्यांच्या उत्पादनांची विक्री प्रभुजी या ब्रँड नावाखाली करते आणि हून अधिक असलेला विस्तृत उत्पादन पोर्टफोलिओ सादर करते. त्यामध्ये विशेषतः पूर्व आणि ईशान्य भारतीय बाजारपेठेत मजबूत ब्रँड ओळख आहे, तसेच पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडीलराज्यांमध्ये जलद सेवा रेस्टॉरंट्स चालवली जातात. आधुनिक ब्रँडप्रभुजीहा सर्वांसाठी उत्सुकतेचा विषय बनला असून कंपनीच्या अत्याधुनिक विपणन धोरणाचे त्याला समर्थन आहे. ब्रँडअँबॅसिडर म्हणून बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते शाहरुख खान आणि रश्मिकामंदाना आहेत.

हल्दीराम भुजियावाला लिमिटेडकडे त्यांच्या रिटेल व्यवसाया बरोबरच वितरण व्यवसायाची एक मिश्र क्षमता आहे. कंपनीकडे देशभरात २००,००० पेक्षा जास्त किरकोळ विक्रेत्यांना सेवा देणारे सुमारे २००० वितरकांचे वितरण नेटवर्क आहे. कंपनी १९ रिटेल आउटलेट्स आणि ६० फ्रँचायझी स्टोअर्स चालवते ज्यामुळे तिची थेट ग्राहकांपर्यंत पोहोच आहे. सध्या, कंपनीचे बाजार पेठेतील स्थान पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि ईशान्य भारतातील प्रदेशात आहे. कंपनी हे निधी त्यांच्या उत्पादन विस्तारासाठी आणि पूर्व व ईशान्य भारतीय बाजार पेठेबाहेरील बाजारपेठेत विस्तारण्यासाठी वापरेल. हल्दीराम भुजियावाला लिमिटेड ६,०३५ मेट्रिकटन प्रति वर्ष संयुक्त क्षमतेसह तीन उत्पादन युनिट्स चालवते.

हल्दीराम भुजियावाला लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मनीष अग्रवाल यावेळी बोलताना म्हणाले, गेली साठहून अधिक वर्षे आम्ही रुचकर स्नॅक्स आणि मिठाई देऊन एक निष्ठावंत ग्राहक वर्ग तयार केला आहे. आमची कंपनी भारताच्या खाद्य सवयी आणि चवींमध्ये क्रांती घडवून आणणारी एक ट्रेंड सेटर ठरली आहे. पाठबळाच्या जोडीने उद्योगक्षेत्रातील आमच्या ज्ञानाचा लाभ घेत आम्ही सम भागधारकांचे मूल्य वाढवण्यासाठी आणि वाढीस चालना देण्यासाठी धोरणात्मक दृष्ट्या स्थित आहोत. ही भागीदारी सर्व भागधारकांसाठी एक समृद्ध भविष्य सुनिश्चित करतदीर्घकालीन आर्थिक लाभ निर्माण करण्याचा ठोस आधार तयार करते, असे श्री. मनीष अग्रवालम्हणाले.

हल्दीराम भुजियावाला लिमिटेडमधील आपल्या गुंतवणुकी बद्दल बोलताना भारत व्हॅल्यू फंडच्या मुख्य गुंतवणूक अधिकारी श्रीमती मधु लुणावत म्हणाल्या, हल्दीराम भुजियावाला लिमिटेडसह भागीदारी करण्यात आम्हाला आनंद होत आहे. मध्ये प्रोप्रायटरशीप म्हणून स्थापना झाल्यापासून सहा दशकांहून अधिक काळाच्या बाजारपेठीय माहितीने कंपनीला ग्राहक वर्तन आणि बाजारातील प्रवाहांचीसखोल समज आहे. आधुनिक ब्रँडप्रभुजीवर नवीन पिढीची मजबूत मदार विशेषउल्लेखनीय आहे. अन्न, , आणि ग्राहक वस्तू क्षेत्रांबाबत आम्ही अत्यंत आशावादी आहोतआणि हल्दीरामयेत्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढ साध्य करण्याच्या स्थितीत आहे. मध्यम बाजारपेठ क्षेत्रातील प्रमुख फंड हाऊसेसपैकी एकदीर्घकालीन यश मिळविण्यासाठी फायदेशीर, विकासाच्या टप्प्यातील कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यावर लक्ष केंद्रित करते. हल्दीराममध्ये केलेली गुंतवणूक ही ची एकूण सहावी गुंतवणूक आहे आणि मागील महिन्यांत ग्राहक क्षेत्रातील तिसरी गुंतवणूक आहे. गेल्या महिन्यात सुरुवातीला ने एक वैयक्तिक स्वच्छता ब्रँड, (मिलेनियम बेबी केअर लिमिटेड) आणि ग्राहक टिकाऊ वस्तू कंपनी, अनिकेत मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात गुंतवणूक केली आहे.

# तुम्हांला स्वर्गीय कल्याणजी भाईंची किती आठवण येत असेल याची कल्पनाही मीं करू शकत नाही

## सचिन संघवी आनंदजी यांना सा रे ग म प च्या सेटवर



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १० : झी टीव्हीवरील सा रे ग म प च्या नवीन पर्वाला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद लाभत आहे. सचिन-जिगर, सचेत-परंपराआणि गुरू रंधावा असे असाधारण मेंटॉर्स आणि विपुल रॉय व सलमान अली यांसारखे सूत्रधार यांच्यासोबत ह्या शोमध्ये आकर्षक परफॉर्मन्सेस पाहायला मिळतील. ह्या वीकेन्डचा भाग आणखी थरारक असणार आहे कारण नावाजलेले बॉलीवूड संगीत दिग्दर्शक आनंदजी विरजी शाह हे ह्या शोमध्ये आपली खास उपस्थिती लावणार आहेत. स्पर्धक महर्षी आणि सुभश्री यांच्या किसी राह में, किसी मोड पर ह्या गाण्यावरील सुंदर परफॉर्मन्सनंतर आनंदजी यांनी त्यांचे स्वर्गीय बंधू कल्याणजी यांची एक आठवण सांगितली. ते म्हणाले की हे कल्याणजी यांच्या आवडत्या गाण्यांपैकी एक होते. त्यांच्या आजारपणातही हे गाणे ऐकून त्यांना बरे वाटायचे. आपल्या भावाबद्दल बोलताना आनंदजी अतिशय भावुक झाले आणि कल्याणजी यांच्या जाण्याने त्यांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या पोकळीमुळे त्यांचे डोळे पाणावले. त्यानंतर सचिनने आपली एक आठवण सांगितली ज्यात त्याला एका वर्क ट्रिपवर जिगरशिवाय एक गीत संगीतबद्ध करायचे होते आणि कसे त्यांचेही नाते आनंदजी कल्याणजी यांच्यासारखेच अतूट आहे. सचिन म्हणाला, काही दिवसांपूर्वी मी एका दुसऱ्या शहरात म्युझिक सिटिंगसाठी गेलो होतो आणि जिगरला बरे नव्हते आणि तो इस्पितळात होता त्यामुळे तो माझ्यासोबत येऊ शकला नव्हता. मी असं म्हणत नाहीये की त्या दिवशी ते गीत संगीतबद्ध झाले नाही, पण त्या ट्रिपवर मला जिगरची खूप आठवण आली आणि तुम्हांला स्वर्गीय कल्याणजी भाईंची दररोज किती आठवण येत असेल याची कल्पनाही मी करू शकत नाही.

# सोनी सब वाहिनीवर प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे ऐतिहासिक मालिका तेनाली रामा



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १०

सोनी सब वाहिनीने टेलिव्हिजनवर महान तेनाली रामाच्या पुनरागमनाची घोषणा केली आहे. या डिसेंबरमध्ये तेनाली रामा ही मालिका सुरू होत आहे. ही मालिका तेनाली रामा या कुशाग्र बुद्धीच्या व्यक्तिमत्त्वाची आठवण ताजी करेल. जीवनातील कठीण प्रसंगातील त्याच्या प्रसंगावधानाचे कौतुक करेल. एकेकाळी विजयनगरच्या राजाचा सल्लागार असलेला तेनाली आता एक पतित नायक आहे. त्याला बहिष्कृत करण्यात आले आहे आणि लोकांच्या रोषाचा त्याला सामना करावा लागत आहे. आपली कुशाग्र बुद्धिमत्ता, विनोद बुद्धी आणि आकर्षक स्वभाव याबद्दल ओळखल्या जाणाऱ्या तेनालीला आपला उद्देश गवसतो आणि एका घोंघावणाऱ्या संकटातून राज्य वाचवण्यासाठी तो पुन्हा विजयनगरात येतो. केवळ चातुर्य नाही तर अनेक गुणांनी संपन्न असलेला तेनाली सहानुभूती आणि भावनात्मक गहनता घेऊन परतला आहे, ज्यामुळे आता तो पूर्वीपेक्षाही जास्त गुणवान आणि समर्थ झाला आहे!

या मालिकेविषयी बोलताना, मालिकेत तेनालीची भूमिका करत असलेला अभिनेता कृष्ण भारद्वाज म्हणतो, तेनाली हे भारताच्या सुवर्ण युगातील एक अत्यंत बुद्धिमान व्यक्तिमत्व आहे. प्रेक्षकांना त्याच्यात एक समजूतदार व्यक्ती आणि मार्गदर्शक दिसेल आणि लहान-थोरसर्वांना तो आपलासा वाटेल. त्याच्या प्रवासात न्याय, समानता, सत्ता संघर्ष यांसारख्या आजच्या काळातील समस्यांचे प्रतिबिंब देखील दिसेल. त्यामुळे आधुनिक भारताशी देखील हे व्यक्तिमत्त्व सुसंगत आहे. मात्र हे सारे विनोदाच्या अंगाने उलगडेल. इतक्या वर्षांपासून ही व्यक्तिरेखा जनमानसात आजही जिवंत आहे. आता ती सुपरिचित आणि त्याच वेळी एका वेगळ्या ढंगाने पडद्यावर साकार करण्यास मी उत्सुक आहे

# जगाने स्वीकारले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दहशतवादाविरोधी 'झिरो टॉलरन्स' धोरण

## दहशतवादाच्या समूळ उच्चाटनासाठी सरकार मजबूत इकोसिस्टमला कटिबद्ध

## कायद्यातील सुधारणेनंतर एनआयए आता परदेशातही करू शकणार तपास



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १०

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने देशाची सूत्रे स्विकारली. पंतप्रधानपदाची धुरा हाती घेताक्षणीच मोदी यांनी भारत आता यापुढे दहशतवादाविरोधात 'झिरो टॉलरन्स'च्या धोरणावर गंभीर आहे, असे ठणकावले होते. दहशतवाद्यांशी कसल्याही परिस्थितीत तडजोड नाही, असे स्पष्ट करीत भाजप सरकारने पुढील १० वर्षांसाठी दहशतवादाविरुद्ध मजबूत इकोसिस्टिम निर्माण करीत या समस्येच्या समूळ उच्चाटनासाठी अनेक योजना आखल्या आहेत.

त्या अनुषंगाने दहशतवादविरोधी परिषद-२०२४ च्या उद्घाटन सत्रातही केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. केंद्रिय गृहमंत्री शहा एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी गेल्या ७५ वर्षांत देशाच्या सिमांचे संरक्षण करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या ३६,४६८ जवानांचेही स्मरण केले. याच परिषदेत केंद्रिय गृहमंत्री शहा म्हणाले, गेल्या १० वर्षांपासून मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने दहशतवादाविरोधात ठोस धोरण अवलंबले आहे. त्याची आज संपूर्ण जगाने दखल घेत हे झिरो टॉलरंस धोरण स्वीकारले आहे. दहशतवाद आणि अंमली पदार्थांच्या विरोधात पंतप्रधान मोदी यांनी कणखर भूमिका घेत मजबूत इकोसिस्टिम विकसित केली. ती देखील जगाने स्विकाली आहे.

दहशतवादाशी लढा देणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेला आज पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने कायदेशीररीत्या बळकट केले आहे. एनआयए कायद्यात झालेल्या या अमुलाग्र सुधारणेमुळे या यंत्रणेला सिमा क्षेत्राबाहेरही तपास करण्याचे अधिकार मिळाले आहेत. त्यामुळे दहशतवादी कारवायांच्या तपासासाठी एनआयए परदेशात जाऊन तेथेही दहशतवादी कारवायांचे पाळेमुळे खोदू शकणार आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यात १४ ऑगस्ट २०१९ रोजी ही सुधारणा करण्यात आली. त्यामुळे तपास संस्थेला दहशतवाद्यांची मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार मिळाले आहेत. या दुरुस्तीअंतर्गत, आता व्यक्ती आणि संघटनांना दहशतवादी ठरवत ताब्यात घेऊन चौकशी करता येणार आहे. आज दहशतवाद ही जगातील सर्वात गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत देशाची सुरक्षा सुनिश्चित करणे, शांतता आणि सुव्यवस्था राखणे आणि दहशतवादाचा नायनाट करणे ही प्रत्येक राष्ट्रासाठी प्राथमिक जबाबदारी आणि आव्हान बनले आहे. गेल्या १० वर्षात मोदी आणि शाह जोडीने केवळ सीमेवरील सुरक्षा बळकट केली नाही तर दहशतवाद आणि त्याच्या सूत्रधारांनाही जोरदार हादरे दिले आहेत. भारत यापुढे आता दहशतवादाला सहन न करीत कसलेही खतपाणी घालणार नाही, असा खणखणीत इशाराही देशाने दिला आहे. दहशतवादी धोक्याचे नियंत्रण आणि मुकाबला करण्यासाठी सरकारने २५-सूत्री एकात्मिक योजना तयार केली आहे. तीत सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी टप्प्यांचा समावेश आहे. सिमेपलीकडी जिहादी दहशतवाद, ईशान्येतील दहशतवाद, डाव्या विचारसरणीचा अतिरेक, बनावट भारतीय चलनी नोटा, अंमली पदार्थांचे परिणाम आता दिसू लागले आहेत. काँग्रेसच्या राजवटीत सिमेपलिकडील पाकिस्तानी दहशतवादी आणि त्यांचे सूत्रधार देशात वारंवार घुसखोरी करत होते. सिमेपलिकडून देशात सातत्याने बॉम्बस्फोट आणि दहशतवादी कारवाया होत होत्या. मोदी आणि शहा यांच्या कणखर भुमिकेमुळे आज तोच पाकिस्तान शांततेची भाषा बोलत आहे. देशात काँग्रेसची सत्ता असलेल्या २००६-२०१३ या कालावधीच्या तुलनेत २०१४-२०२१ या मोदी सरकारच्या काळात दहशतवादी घटनांमध्ये ७०% घट झाली.

# असं वाटलं की आम्ही सीडीची मजा आणि एखाद्या चित्रपटातील दृश्य पाहत आहोत



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १०

असे सा रे ग म प मेंटॉर गुरू रंधावा स्पर्धक पार्वती आणि उज्वल यांचा परफॉर्मन्स पाहून म्हणाला. झी टीव्हीवरील सा रे ग म प च्या नवीन पर्वाला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद लाभत आहे. सचिन-जिगर, सचेत-परंपराआणि गुरू रंधावा असे असाधारण मेंटॉर्स आणि विपुल रॉय व सलमान अली यांसारखे सूत्रधार यांच्यासोबत ह्या शोमध्ये आकर्षक परफॉर्मन्सेस पाहायला मिळतील. ह्या वीकेन्डचा भाग आणखीथरारक असणार आहे कारण नावाजलेले बॉलीवूड संगीत दिग्दर्शक आनंदजी विरजी शाह हे ह्या शोमध्ये आपली खास उपस्थिती लावणार आहेत. सर्वोच्च १० स्पर्धकांनी मेंटॉर्स, प्रेक्षक आणि विशेष अतिथींसमोर आपले सर्वोत्तम पाऊल पुढे टाकले असून पार्वती आणि उज्वल यांच्या बेखुदी में सनम आणि मेरे मितवा मेरे गीत ह्या गाण्यांवरील परफॉर्मन्सने मेंटॉर गुरूचे मन जिंकले. त्यांच्या परफॉर्मन्सनंतर गुरू रंधावाने सांगितले की कसे त्याला वाटले की तो एखादा साऊंडट्रॅक ऐकत आहे आणि चित्रपटातील दृश्य पाहत आहे. गुरू म्हणाला, यांचा परफॉर्मन्स ऐकताना असे वाटले की आम्ही एखाद्या सीडीचा आनंद घेत आहोत आणि एखाद्या चित्रपटातील दृश्य पाहत आहोत. त्यांचा परफॉर्मन्स अचूक होता. हा सा रे ग म प चा स्तर आहे आणि आमचे गायक आपल्या असाधारण प्रदर्शनाने ह्या शो च्या उंचीला आणखी वर घेऊन जात आहेत. पार्वती आणि उज्वल यांच्या परफॉर्मन्सने सर्वांचेच मन जिंकले असता, ह्या खास एपिसोडमध्ये बाकी स्पर्धकांचे परफॉर्मन्सेस पाहायला चुकवू नका.

# अभिनेत्रींनी सांगितले थंडीतील स्किनकेअरचे गुपित!

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १०

थंडी गारवठतेय आणि थंडीच्या महिन्यात आपल्या वॉर्डरोबमध्ये बदल करण्यासोबत आपल्या स्किनकेअर रूटिनमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे. संपूर्ण थंडीच्या महिन्यांमध्ये त्वचा आनंदी, कोमल आणि चमकदार ठेवण्यासाठी एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री थंडीमधील त्यांच्या सर्वोत्तम सिक्रेट स्किनकेअर रूटिन्सबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत नेहा जोशी (कृष्णा देवी वाजपेयी, अटल'), स्मिता साबळे (धनिया, भीमा'), गीतांजली मिश्रा (राजेश, हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, भाबीजी घर पर है'). मालिका अटल'मधील नेहा जोशी ऊर्फ कृष्णा देवी वाजपेयी म्हणाल्या, हिवाळा ऋतू हवेतील गारव्यासह गरमागरम कॉफीचा आस्वाद घेण्यासाठी, तसेच निसर्गाच्या सौंदर्यामध्ये भारावून जाण्यासाठी परिपूर्ण आहे. पण, हिवाळा त्वचेसाठी आव्हानात्मक देखील ठरू शकतो, त्वचा कोरडी व निस्तेज होऊ शकते. म्हणून त्वचेचे संरक्षण करण्यासोबत मॉइश्चराइज ठेवणे आवश्यक आहे. माझ्या त्वचेचे आरोग्य उत्तम ठेवण्याकरिता मी सौम्य एक्स्फोलिएशनसाठी आठवड्यातून दोनदा घरगुती स्क्रबचा वापर करते. माझ्या पसंतीच्या स्क्रबमध्ये ओटचे जाडे भरडे पीठ, संत्र्याच्या सालीची पावडर आणि गुलाब पाण्यात मिसळलेली लाल मसूर पावडर यांचे मिश्रण असते. मी चेहऱ्यावर तो स्क्रब लावून अर्धा सुकेपर्यंत ठेवते, त्यानंतर सौम्यपणे चेहऱ्याला मसाज करते आणि थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुते. यामुळे त्वचा कोमल व उजळ बनते. तसेच या मिश्रणामुळे तीन ते चार दिवस माझ्या त्वचेमधील ओलावा व मॉइश्चराइज कायम राहते. हिवाळ्यादरम्यान त्वचा चमकदार व कोमल करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकासाठी मी या स्क्रबची शिफारस करते.'' मालिका भीमा'मधील स्मिता साबळे ऊर्फ धनिया म्हणाल्या, हिवाळा जवळ येताच मी त्वचा आरोग्यदायी व कोमल राहण्यासाठी त्वचेची अधिक काळजी घेते. मी दररोज सुरूवातीला सौम्य, हायड्रेटिंग फेश वॉशसह चेहरा स्वच्छ धुते, जे चेहऱ्यामधील नैसर्गिक ऑईल्स काढून टाकत नाही. मी त्यानंतर रोजवॉटर टोनर लावते, जे माझ्या त्वचेला रिफ्रेश करते आणि संपूर्ण दिवसासाठी त्वचेला चमकदार ठेवते. माझे पसंतीचे मॉइश्चराइजर आहे जाड, क्रीम-आधारित फॉर्म्युला, ज्यामध्ये शीया बटर व बदामाचे तेल यांसारखे घटक आहेत, जे त्वचेमधील ओलावा कायम ठेवतात आणि त्वचा कोरडी होण्यापासून संरक्षण करतात.


Formate C-1

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name of address of candidate: Agrawal Vinod Santoshkumar

Name of Political party: Bharatiya Janata Party

Name of Election: Maharashtra Legislative Assembly - 2024

Name of Constituency: 65-Gondia, Dist-Gondia

I Agrawal Vinod Santoshkumar a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending criminal cases

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status case (S) | Section(s) of Acts concerned and brief description of offences(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Hon'ble Special Court Gondia | SCC 138/2023 Dated-24/01-2023 | Say/Hearing on Exh. | U/S 188 of I.P.C & Sec. 123 of Representation of people Act |
| 2. | Hon'ble Special Court Gondia | SCC 139/2023 Dated-24/01-2023 | For furnishing bail under the provision | U/S 269, 188 of I.P.C. |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sr. No. | Name of Court and dates(s) of orders(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed | |
|---|---|---|---|---|
| 1 | -NA- | -NA- | -NA- | |

Place :- Gondia
Date :- 03.11.2024

Sd/-
Vinod Santoshkumar Agrawal



Format- C-1

**Declaration about criminal cases**

( As per tha judgment dated 25 th September,2018 of Hon'bl Supreme Court in WP ( Civil) No. 536 of 2011 ( Publice Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name of address of candidate : **Vijay Bharatlal Rahangdale At- Khamari Po- Chikhali Ta- Tirora Dist-Gondia 441911.**

Name of Political party: **Bharatiya Janta Party**

Name of Election : **Maharashtra Legislative Assembley - 2024**

Name of Constituency :- **64- Tirora Dist- Gondia.**

I **Vijay Bharatlal Rahangdale** , a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pnding criminal cases

| Sr.No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(S) | Section(s) of Acts concerned and brief description of offeneces (s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Special Court Gondia | SCC 142/2023 Date- 24/01/2023 | Evidance | U/S 341,143,188,269 of IPC |

(B) Deatils about cases of conviction for criminal offences

| Sr.No. | Name of Court and dates(s) of orders(s) | Description of offernce (s) & punishment imposed | Maximum Punishmnet Imposed |
|---|---|---|---|
| 1 | -NA- | -NA- | -NA- |

Place:- Tirora

Date- 31/10/2024

Vijay Bharatlal Rahangdale

# प्रतिबंधित सुगंधित तंबाखू विक्रेत्यास अटक

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. १० :

तालुक्यातील मौजा- सिर्सी पुनर्वसन येथे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू बाळगून त्याची विक्री करणाऱ्या आरोपीविरुद्ध वेलतूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

जगदिश उर्फ जग्गु वसंता पानसे (वय-30) रा. सिर्सी पुनर्वसन असे आरोपीचे नाव असून गावातच जग्गू पान पॅलेस या नावाने त्याची पान टपरी आहे. त्याच्याच पान टपरीत प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आढळून आले.

पोलीस स्टेशन वेलतूर येथील स्टाफ पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार मौजा सिर्सी पुनर्वसन येथे एक इसम प्रतिबंधित सुगंधित तंबाखू बाळगून त्याची विक्री करत असल्याची माहिती मिळाली. लागलीच पोलिसांनी सापळा रचून स्टाफसह रेड केली असता जगदिशच्या पान टपरी मध्ये प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आढळून आले. आरोपीकडुन लाल रंगाची प्लास्टीक पॅलीथीन पॅकेट त्यावर VIRAT असे लिहीलेले 19 पॅकेट, प्रत्यकी अंदाजे 250 ग्रॅम किमंती 160/ रु एकुण 3040 /- रु. चा माल तसेच काळया शेंदरी रंगाचा पॅकेट ज्यावर ईग्रजीमध्ये EAGIE व मराठीत ईगल असे नाव लिहलिले 07 पॅकेट प्रत्येकी 400 ग्रॅम कि. 640 रु एकुण 4480/- रु असा एकुण 7520 /- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याचे हितासाठी सुगंधीत तंबाखु तत्सम पदार्थ उत्पादन करणे विक्री निमीर्ती साठवणुक वितरण करण्यास प्रतिबंध केलेले असतानां सुदधा यातील आरोपीने सुगंधीत तंबाखु साठवणुक केली असल्याने त्याचे विरुदध वेलतूर पोलीस स्टेशन येथे कलम 223, 274, 275 अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला आहे.

# ई-रिक्षातून प्रतिबंधित तंबाखू केली जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

ई-रिक्षातून प्रतिबंधित तंबाखू घेऊन जात असलेल्या तीन आरोपींना गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने गोपनिय माहितीवरून अटक केली. पोलिसांनी त्यांच्याकडून 1,79,400 रुपयांचा माल जप्त केला आहे. विवेक सुनील मोहळे (29) रा. संगम चाळ, धंतोली, सूरज राजू खडसे (24) रा. वॉकर रोड, महाल आणि रजनीश मानकाप्रसाद तिवारी (42) रा. वडोहरा, मध्यप्रदेश अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. शनिवारी सकाळी 10 वाजताच्या सुमारास गुन्हे शाखा युनिट 4 चे पथक गणेशपेठ ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान ई-रिक्षातून प्रतिबंधित तंबाखू आणि पान मसाला नेण्यात येत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर सापळा रचून डालडा कंपनी चौकात ई-रिक्षा अडविण्यात आला.

वरील तिन्ही आरोपी मालासह आढळले. त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता हा माल मध्यप्रदेशच्या जबळपूर येथील अजय चौरसियाकडून खरेदी केल्याची माहिती दिली. तसेच मध्यप्रदेशच्या रीवा येथील रहिवासी जयदीप प्रधान याच्या ट्रॅव्हल्स बसने नागपुरात आणल्याचे सांगितले. पोलिसांनी या प्रकरणात अजय आणि जयदीप या दोघांनाही आरोपी करून वरील आरोपींना अटक केली.

# सत्तेत मदमस्त झालेल्यांचा हिशोब करायची आहे वेळ : सुनील केदार

## महाविकास आघाडीचा कार्यकर्ता मेळावा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १० :

सत्ता आणि सत्तेतून मिळवलेली संपत्ती यातून काही लोकप्रतिनिधींना माज चढलाय सत्तेच्या मधोमस्तीत आणि पैशाच्या गर्मीत बेताल वक्तव्य करून स्वतःच्या बुद्धीचे दिवाळखोरपणा दाखवण्याचे काम हिंगणा मतदारसंघातील लोकप्रतिनिधी करत आहेत. स्वतःच्या संस्थात्मक साम्राज्याला झळाळी देण्यासाठी फुटपाटवर बसून स्वतःच्या पोटाची खडकी भरण्याकरिता मेहनत करणाऱ्या गोरगरिबांचे दुकानं तोडले जातात ते स्वतःच्या साम्राज्याला सौंदर्य प्राप्त व्हावी म्हणून. अशा मदमस्त लोकप्रतिनिधीला त्याचा हिशोब करून घरी पाठवण्याची वेळ आहे असे वानाडोंगरी हिंगणा येथे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रमेशचंद्र गोपीकिसन बंग यांच्या प्रचारार्थ आयोजित महाविकास आघाडीच्या कार्यकर्ता मेळाव्यात माजी मंत्री सुनील केदार बोलत होते.

पुढे बोलताना केदार म्हणाले की, या हिंगणा मतदारसंघात स्थानिक आमदाराने ठेकेदारी प्रवृत्तीला जन्माला घालून बेबंध शाही व गुंडगिरी या मतदारसंघात वाढविली त्याला आळा घालण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून बहुमताने निवडून देण्याची गरज आहे.

मेळाव्याला महाविकास आघाडीचे उमेदवार रमेशचंद्र बंग, माजी आमदार विजय घोडमारे (पाटील ), जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष कुंदाताई राऊत, किशोर गजभिये, जि प माजी सभापती उज्वला बोढारे, नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रकाश नागपुरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी संबोधित केले.

यावेळी व्यासपीठावर मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री सुनीलबाबू केदार प्रमुख उपस्थिती म्हणून खासदार श्यामकुमार बर्वे, माजी आमदार विजयजी घोडमारे (पाटील )माजी आमदार प्रकाश गजभिये, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष कुंदाताई राऊत, राकापा (श.प) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजू राऊत, जिप माजी सभापती उज्वलाताई बोढारे, जिप माजी सभापती भारतीताई पाटील, जिप सदस्य दिनेश बंग, जिप सदस्यां वृंदाताई नागपुरे, जिप सदस्य संजयज जगताप, जिप सदस्य ममता धोपटे, पंस नागपूर सभापती रूपाली मनोहर, पस सभापती हिंगणा सुषमा कावळे कडू, माजी जिप सदस्य रश्मी कोटगुले, कृषी उत्पन्न बाजार समिती कळमना नागपूरचे सभापती अहमदबाबू शेख,कृषी उत्पन्न बाजार समिती कळमना नागपूरचे उपसभापती प्रकाश नागपुरे कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणा सभापती बबनरावजी आव्हाळे, रा कापा (शप ) हिंगणा तालुका अध्यक्ष, योगेश सातपुते, आंबेडकरी रिपब्लिकन मोचार्चे नारायण बागडे, हिंगणा पं स उपसभापती पौर्णिमा दीक्षित, प.स नागपूर माजी उपसभापती संजय चिकटे नागपूर पं स उपसभापती, प.स सदस्य सुनील बोंदाडे, प.स सदस्य राजेंद्र उईके, पस सदस्य अनुसया सोनवणे, प.स सदस्य रुपाली खाडे,प.स सदस्य आकाश, प.स सदस्य वैशाली कचोरे, माजी प.स सदस्य उमेश राजपूतप.स सदस्य प्रीतीताई अखंड प.स सदस्य सुलोचनाताई ढोके प.स सदस्य अपर्णा राऊत माजी सभापती रेखा कळसकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे हेमराज डाखोळे, माजी जि प सदस्य गोवर्धन प्रधान ,माजी प.स. सदस्य पुरुषोत्तम डाखळे,संतोष नरवाडे, श्याम मंडपे, सुरेंद्र मोरे, पप्पू जैस्वाल,मिथिलेश कनेर, वसंतराव ईखनकर, विठ्ठल कोहाड,समाजसेवक मोनू सिंग आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# शेगावचा संत गजानन महानाट्य

## एकाच दिवशी सलग दोन प्रयोग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

सोमवार दि.११ नोव्हेंबरला, कविवर्य सुरेश भट सभागृहात "शेगावीचा संत गजानन" या



महानाट्याचे सलग दोन प्रयोग आयोजित केले आहे. स्वर मंथन निर्मित या महानाट्याचे लेखक, दिग्दर्शक प्रभाकर ठेंगडी हे आहेत. प्रथम प्रयोग संध्याकाळी ५:३० वाजता स्व. नाथ मामा काळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ आणि वामन जोशी यांच्या जन्मशताब्दी निमित्त सादर होत आहे.

दुसरा प्रयोग रात्री ८:३० वाजता असून या प्रयोगाचे आयोजन श्री राजेंद्र हायस्कूलचे माजी विद्यार्थी करीत आहेत. नृत्य, नाट्य, दिंडी, कीर्तन, भजन या सर्व कलाप्रकाराने नटलेल्या या महानाट्यात एकूण ५० कलावंत आहेत. दोन्ही प्रयोग निःशुल्क असून गजानन महाराजांच्या भक्तगणांनी बहुसंख्येने यावे असे आवाहन निमार्ता मोहन पात्रीकर आणि सूत्रधार मोहन नाहातकर यांनी केले आहे.

# युवकांना रोजगार देण्यासाठी अग्रक्रमाने काम करणार : सुधीर पारवे

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. १० :

विधानसभा क्षेत्रातील युवकांना रोजगार मिळावा यासाठी अग्रक्रमाने काम करणार असल्याचे प्रतिपादन महायुतीचे उमरेड विधानसभेचे लोकप्रिय उमेदवार माजी आ. सुधीर पारवे यांनी केले. शहरातील प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शुक्रवारी (दि.८) उमरेड शहरातील विकास कॉलनी येथे भारतीय जनता पक्षाच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन महायुतीचे उमेदवार माजी आ. सुधीर पारवे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी माध्यमांशी संवाद साधताना सुधीर पारवे म्हणाले की, विधानसभा क्षेत्राचा आमदार म्हणून दहा वर्षे पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केले. आगामी काळात युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असून युवकांच्या हाताला काम मिळावे यासाठी अग्रक्रमाने प्रयत्न करणार असल्याचे सांगत शेतकरी हा देशाचा पोशिंदा असून त्याला शेतात जाण्याचे मार्ग व्यवस्थित असले पाहिजेत त्यासाठी पांधन रस्त्यांचे काम सुद्धा




प्राधान्याने करणार असल्याचे पारवे यांनी म्हटले.

आपल्यासारख्या एका सामान्य कार्यकर्त्याला भारतीय जनता पक्षाने तब्बल चार वेळा निवडणूक लढवण्याची संधी देऊन विश्वास दाखवल्याबद्दल सुधीर पारवे यांनी नरेंद्र मोदी, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे या वरिष्ठ नेत्यांसह भारतीय जनता पक्षाच्या जिल्ह्यातील सर्व नेते व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत आभार मानले.

प्रचार कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी पदाधिकारी कार्यकर्ते व सामान्य नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# २.३२ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

कुटुंब घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने रोख आणि दागिन्यांसह दोन लाख बत्तीस हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी रोशन मोहन गेडाम (43) रा. कोहळे लेआऊट, योगेश्वरनगर, दिघोरीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गेडाम कुटुंब हे मुळचे चंद्रपूरच्या कळसगाव येथील रहिवासी आहे. गत 5 नोव्हेंबर रोजी संपूर्ण कुटुंब घराला कुलूप लावून मुळगावी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचे दागिने व रोख 2 हजार असा एकूण 2,32,000 रुपयांच्या मालावर डल्ला मारला. शुक्रवारी दुपारी गेडाम कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# शेतकऱ्यांना लागली कापूस, सोयाबीनच्या दरवाढीची प्रतीक्षा

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १० :

**लागवड खर्च निघणेही कठीण**

शेतकऱ्यांनी घाम गाळून उत्पादित केलेल्या मालाला भाव नाही. सध्या बाजारपेठेत सोयाबीनला ३ हजार ७०० ते ४ हजार २०० रुपये दर मिळत आहे. हमी भावापेक्षा ही कमी दराने खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. शेतमालाला असाच भाव मिळत राहिल्यास शेतकऱ्यांपुढील आर्थिक संकट आणखीच वाढण्याची भीती आहे. कापसाचा हमी दर ७ हजार ४२१ रुपये आहे. प्रत्यक्षात साडेसहा हजारांपर्यंतच भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. बहुतांश शेतकऱ्यांच्या शेतमालाचे दर वाढत नसल्याने घरातच पडून आहे. सोयाबीन, कापूस आदी शेतमालाच्या किमतीत सातत्याने घसरण होत आहे. दर कमी असतानाही शेतकऱ्यांना नाईलाजाने शेतमालाची विक्री करावी लागत आहे. बहुतांश शेतकऱ्यांना सावकाराचे आणि कृषी केंद्रातून घेतलेल्या साहित्याचे पैसे चुकता करायचे आहे. वेळेवर रकमा चुकता न केल्यास व्याजाचा भुर्दंड बसणार आहे. याच कारणातून शेतकरी माल विकत आहे. आज शेतमालास जो भाव मिळत आहे. त्यातून लागवडीकरिता लागलेला खर्चही भरुन निघणे कठीण आहे. मागील दशकापासून कापूस, सोयाबीन आणि इतर शेतमालाच्या दरात पाहिजे त्या प्रमाणात वाढ झालेली नाही.

इतर वस्तूंच्या किमतीत मात्र भरमसाठ वाढ झाली आहे. कृषी निविष्ठा खत, बी- बियाणे आणि मजुरीच्या दरात मोठ्याप्रमाणात वाढ झालेली आहे. मध्यंतरी सोयाबीन, कपाशीला चांगला भाव मिळाला, मात्र त्यात सातत्य राहिले नाहीत. त्यामुळे शेतकरी आर्थीक संकटात सापडतो.

# सुरक्षा नगरात सांडपाणी रस्त्यावर




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

येथील सुरक्षा नगर मधील बाटा शो रूम जवळ सांडपाणी वाहून नेणारी नाली फुटली असुन चेंबर सुध्दा बुजलेले आहे. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर आले आहे. या विषयी स्थानीक नागरीकांनी वाडी नगर परिषद कडे तक्रार दाखल केली. परंतु त्यावर अजुनपर्यंत कुठलीही कारवाई केली नसल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे.

लवकरात लवकर रस्त्यावर वाहणाऱ्या सांडपाण्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी संतोष दुपारे, रोशन दुपारे, सुभाष पडोळे, संदीप सुरे, अनिल लिचडे, मनोज बनकर, दामोधर गावंडे, संजय सुरे, राज शिंग, सुभ्रमण्य मनी,शंकर देशमुख यांच्यासह गावातील नागरिकांनी केली आहे.

# १२७ गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

आगामी विधानसभा निवडणूक सुरळीत, शांततेत तसेच भयमुक्त वातावरणात पार पडावी. गुन्हेगारीवर नियंत्रण मिळावे, कुठलीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी परिमंडळ -5 अंतर्गत 8 पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 127 सराईत गुन्हेगारांची परेड घेतली.

विधानसभा निवडणुकीला आता केवळ 13 दिवस शिल्लक आहेत. त्याअनुषंगाने पोलिस दलाकडून ही पूर्व तयारी सुरू आहे. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंघल यांनी सर्व पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी 8 ही ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना आदेश दिले. पोलिस पथकाने 127 सराईत गुन्हेगारांना पकडून उपायुक्त कार्यालयाच्या प्रांगणात हजर केले. उपायुक्त कदम यांनी गुन्हेगारांची परेड घेतली.

यात शहरातील सराईत गुन्हेगार, कारागृहातून सुटलेले आणि एमपीडीएमधून रिलीज झालेल्यांचा समावेश होता. कदम यांनी निवडणुकी दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार केल्यास कठोर कारवाईचा इशारा देत प्रतिबंधक कारवाई केली. गुन्हेगारांकडून हमीपत्रही भरून घेण्यात आले. पोलिसांच्या धडक कारवाईमुळे गुन्हेगारात धडकी भरली असून अनेक गुन्हेगार शहरातून बाहेर गेले आहेत तर काही भूमिगत झाले आहेत.

# समाजाचा दातृत्व भाव जागवण्यासाठी ग्रामायणचे प्रयत्न : श्रीधर गाडगे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

माणसाला जगण्यासाठी भौतिक उन्नती आवश्यक असते. पण त्याचबरोबर मानसिक आणि सामाजिक उन्नतीदेखील महत्त्वाची आहे. अभ्युदय म्हणजे केवळ भौतिक प्रगती नाही, तर तो त्या समाजाचा सांस्कृतिक आणि वैचारिक प्रगल्भतेचा पाया असावा लागतो. आपल्या देशाला दातृत्वाची व सेवेची मोठी परंपरा आहे, हीच परंपरा ग्रामयान प्रतिष्ठानने जोपासल्याचे गौरवोदगार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे यांनी केले.

फ्रेंडस को-ऑप.हाऊसिंग सोसायटीच्या सहकार्याने ग्रामायण प्रतिष्ठानच्या वतीने विदर्भ व महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या सेवा संस्थांचे काम समाजासमोर आणण्यासाठी अभ्युदय सेवा प्रदर्शन तात्या टोपे नगर, पश्चिम न्यायालय मार्ग, येथील तात्या टोपे सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन नुकतेच पार पडले. उदघाटन सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून टीसीएस नागपूरचे आनंद आकनुरवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे, डब्लूसीएल, नागपूरचे सीएसआर/वेलफेअर जनरल मॅनेजर अनिलकुमार सिंग, अमरस्वरूप फाउंडेशनचे अध्यक्ष तथा उद्योजक मनिषभाई मेहता, सेवा सदन संस्था, नागपूरच्या सचिव वासंतीताई भागवत, दैनिक हितवादचे मुख्य संपादक विजय फणशीकर, यवतमाळ अर्बन बँक अध्यक्ष नितीन खरचे, फ्रेंडस को-ऑप. हायसिंग सोसायटीचे सुरेश देशपांडे, ग्रामायण प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल सांबरे उपस्थित होते.

एका दैनिकाचे मुख्य संपादक विजय फणशीकर म्हणाले, सरकार आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडत नसल्याने समाजाच्या विकासासाठी एनजीओ स्थापन कराव्या लागतात. समाजाच्या गरजा आणि देशाच्या विकासासाठी एकत्रित कार्य करणं आवश्यक आहे. समाज आणि सरकार एकत्र येऊन सेवा कार्य केले तर समाज जीवन अधिक समृद्ध होईल.

देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी सेवा संस्था मोठे योगदान देत आहेत, असेही ते म्हणाले. अमरस्वरूप फाउंडेशनचे अध्यक्ष तथा उद्योजक मनिषभाई मेहता यांनी कबाड़ से जुगाड़ उपक्रमाबाबत सांगितले की घराघरात कबाड वस्तू असतात. अनेक वेळा, फोन आल्यावर आम्ही या वस्तू गोळा करतो आणि नंतर ती गडचिरोलीतील आदिवासी लोकांना दान म्हणून पाठवतो.

टीसीएस नागपूरचे आनंद आकनुरवार यांनी टीसीएसच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विदभार्तील विविध जिल्ह्यांमधील लहान गावांमध्ये आमचे काम सुरू आहे, विशेषतः गडचिरोलीमध्ये, जिथे हृदय एनजीओच्या सहकार्याने अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये मुख्यतः एप्लिकेशन डेव्हलपमेंटचा समावेश आहे, कारण आमचा उद्देश नागपूरच्या अतिशय दुर्गम भागात असलेल्या लहान गावांपर्यंत पोहोचण्याचा आहे. या प्रयत्नांत आम्ही टेक्नॉलॉजी वापरण्याचा विचार करत आहोत, जे घरच्या घरी सहज वापरता येणारे असे मॉडेल्स तयार करण्यात मदत करतील. यामध्ये वेबसाईट निर्माण, विविध डिजिटल सेवा यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी, इतर मान्यवरांची भाषणे झालीत. प्रास्ताविक व परिचय चंद्रकांत रागीट यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन व आभार एड. जयश्री अतकरी यांनी मानले. कार्यक्रमाला सचिव संजय सराफ,अभ्युदय प्रकल्प संचालक अनिरुद्ध केळकर,अभुदय समन्वयक मंजुषा रागीट व ग्रामायणचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# उमेदवार तर दुरच परंतु समर्थकांमध्ये रंगला सोशल मीडियावर सामना

## एकमेकांना पाण्यात दाखविण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत असतात. एकमेकांवर टीका-टिप्पणी करणारे नेते काही वेळाने एकत्र येऊन गप्पा मारतात. पण, उमेदवारांचे समर्थक आणि विरोधक मात्र आपसात वाद करून वैर ओढवून घेत आहे. निवडणूक पंधरा दिवसांची मात्र वैर आयुष्यभरासाठी, असे चित्र सध्या ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. हिंगणा विधानसभा मतदारसंघात एकुण ४ लाख ४२ हजार २१५ मतदार असुन पुरुष २ लाख २२ हजार २०९, महिला २ लाख २० हजार ००६ तर तृतीयपंथीचे मतदार शुन्य आहे. सोशल मीडियावर प्रमुख पक्षांच्या उमेदवारांचे समर्थक आणि विरोधकांमध्ये सोशल वॉर सुरू झाला आहे.

सकाळपासूनच व्हॉट्सअ‍ॅप, एकमेकांविरोधात फेसबूकवर पोस्ट करून एकमेकांची उणी दुणी काढली जात आहे. या वादात अत्यंत हीन भाषेचा वापर केला जात आहे. त्यामुळे यावरून वाद निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे. उमेदवार या सर्व गोष्टींपासून दूर असले, तरी समर्थकांमध्ये मात्र आरोप-प्रत्यारोपांचा सामना रंगला आहे.

हिंगणा विधानसभा मतदारसंघात धनशक्ती विरुद्ध जनशक्ती या प्रचारावर सर्वाधिक जोर देत आहे. महायुतीतील भाजपचे उमेदवार आ. समीर मेघे व महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रमेशचंद्र बंग यांच्यात थेट लढत होणार आहे. एक उमेदवार तरुण तर एक उमेदवार वयस्कर असल्यामुळे या वर सुद्धा सोशल मिडीयावर एकमेकाच्या उमेदवारावर आरोप करीत असल्यामुळे नागरीकांचे मनोरंजन होत आहे. पुढील ९ दिवस प्रचाराचा धुराळा उडणार आहे, पण सोशल मीडियावर प्रचाराचा धुराळा गेल्या आठ-दहा दिवसांपासून सुरू झाला आहे. त्यातच सोशल मीडियावर उमेदवारांचे समर्थक आणि विरोधकांमध्ये वाद सुरू झाला आहे. त्यात उमेदवारांचे समर्थक आपला उमेदवार कसा सरस आहे आणि विरोधी उमेदवार कसा कमजोर आहे याचा हिशोब सांगत आहे. कुणी १० वर्षे जनतेची की, कंत्राटदाराची सेवा केली, असा सवाल करीत आहे. तर, विरोधकांकडून त्याला तोडीस तोड प्रत्युतर दिले जात असून, केवळ भूमिपूजन करणारा नको, तर विकासाला चालना देणारा हवा, असे उत्तर दिले जात आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कॅलिडोस्कोप




## परफेक्ट कॉम्बिनेशन

*निसर्गाने प्रत्येक जीवाला काही ना काही वरदान दिलं आहे. अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी काही गुणवैशिष्ट्यांची भेट दिली आहे. आता पक्ष्यांची ही जोडीच बघा ना... किती लय आहे त्यांच्या शरीररचनेत... मानेचं ते दिमाखदार वळण तर किती सुंदर! शुभ्र पांढऱ्या शरीराला केशरी चोच हे किती परफेक्ट कॉम्बिनेशन! खरंच...निसर्गनामक किमयागाराची थोरवी काय वर्णावी!*

## व्हिडिओ पाहून काढला रुग्णाचा ईसीजी!

'सोशल मीडिया'वर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये, एक वॉर्डबॉय यूट्युबवर व्हिडिओ पाहून रुग्णाचा ईसीजी करताना दिसत आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर रुग्णालय प्रशासन सावध झाले असून वॉर्ड बॉयवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

दिवाळीनिमित्त रुग्णालयातील अन्य कर्मचारी रुग्णालयामध्ये अनुपस्थित होते. रुग्ण आजारपणाची तक्रार घेऊन आला, तेव्हा तिथे उपचारासाठी कुणीच नव्हते. त्यामुळे वॉर्ड बॉय रुग्णाची इलेक्ट्रोकार्डियोग्राम (ईसीजी) चाचणी घेत असल्याचे दिसून आले आहे. लोकांचा विरोध असूनही त्यांना न जुमानता तो युट्युब पाहून रुग्णाचा 'ईसीजी' काढत होता. नकार देऊनही वॉर्डबॉय ऐकायला तयार नव्हता. वॉर्ड बॉयला 'ईसीजी'चाचणी कशी करायची हे कळत नाही. दिवाळी असल्याने रुग्णालयात तंत्रज्ञ आणि वैद्यकीय कर्मचारी उपस्थित नव्हते. त्यामुळे ईसीजी चाचणी करत असल्याचेही त्यांनी सांगितले. ही एक महत्त्वाची चाचणी आहे. यामुळे रुग्णाचा जीव जाऊ शकतो. वॉर्डबॉयने तपासणी सुरू ठेवली. तो म्हणाला, हो, मी ही चाचणी प्रथमच करत आहे. पण त्यात काही अडचण आहे का? 'सोशल मीडिया'वर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, जोधपूर मेडिकल कॉलेजचे प्रमुख बी.एस. जोधा यांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली आणि आरोपी वॉर्डबॉयवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.



## फ्लाईट अटेंडटची नोकरी सोडून 'वेगळे' काम!

पैसे कोणाला नको हवे असतात? प्रत्येकाला मेहनत करून जास्त पैसे कमवायचे असतात. यासाठी अनेक वेळा लोक आपले काम आणि व्यवसाय बदलतात. एका २१ वर्षांच्या मुलीनेही असेच केले. ती फ्लाइट अटेंडंट होती आणि तिच्या नोकरीसाठी तिला बरेच दिवस घर आणि कुटुंबापासून दूर राहावे लागले. यानंतर मुलीने नोकरी सोडून घरातून 'वेगळे' काम सुरू करण्याचा निर्णय घेतला. आता ही मुलगी म्हणते, की पूर्वी मी एका महिन्यात जेवढी कमाई करत असे, तेवढे एकाच दिवसात करते. अलाना पॉव नावाच्या २१ वर्षीय मुलीने फ्लाइट अटेंडंट बनण्याचे प्रशिक्षण घेतले आणि नंतर नोकरीसाठी जगभर प्रवास केला. तिने सांगितले, की दिवसांतून १४ तास काम करणे आणि घरापासून दूर राहणे अनेकदा एकटे आणि थकवणारे होते. अलाना दिसायला सुंदर होती आणि थोडी बोल्डसुद्धा, त्यामुळे लोक तिच्या सौंदर्याचे वेडे होते. 'सोशल मीडिया'वर फोटो शेअर केल्यानंतर, लोक विचारत, की तिच्याकडे कोणतेही 'अॅडल्ट पेज' आहे का? येथूनच अलानाला नवीन कामाची माहिती मिळाली आणि त्यानंतर तिने नोकरी सोडली. ऑस्ट्रेलियाची रहिवासी असलेल्या अलानाने सांगितले की, अनेकवेळा सहकारी गमतीने म्हणायचे की मी 'डल्ट पेज'बनवावे; पण मला तसली मुलगी व्हायचे नव्हते. तथापि, मला मिळणाऱ्या प्रतिक्रिया पाहता, मी प्रयत्न करण्याचे ठरवले. आता अलाना यशस्वी झाली आहे आणि ती म्हणते, की तिने हे काम लवकर केले असते, तिची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. तिने पहिल्या महिन्यात तब्बल ६०,००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स (३२ रुपये) कमावले आहेत.



## चोरीचे ३७ रुपये ५४ वर्षांनी व्याजासह परत



उधारी आणि चोरी हे दोन भिन्न शब्द आहेत. कोणी पैसे चोरतो, कोणी कर्ज घेतल्यावर विसरतो किंवा आपली इज्जत विकून परत करण्यास नकार देतो. लोक लाखो रुपयांची चोरी करतात आणि मागे वळून पाहत नाहीत; पण अशीही एक व्यक्ती आहे, जिने ५४ वर्षांपूर्वी चोरीला गेलेले ३७ रुपये व्याजासह परत करण्याचे ठरवले आणि ते परत केले.

रणजीत नावाच्या या व्यक्तीने १९७० मध्ये ३७ रुपये चोरले होते. या पैशाची चोरी आता रणजीतला आतून खात होती. रणजीत त्या वेळी गरीब होता. तो श्रीलंकेतील नुवारा भागातील एका चहाच्या मळ्याजवळ राहायचा आणि मजूर म्हणून काम करायचा. एके दिवशी, एका मळ्यात काम करणाऱ्या जोडप्याने नवीन घरात शिफ्ट होत असताना त्यांना त्यांच्या घरातील वस्तू गोळा करण्यासाठी बोलावले. सामान बाहेर काढत असताना त्याला उशीखाली ३७ रुपये सापडले. आजच्या काळात ही रक्कम खूपच कमी आहे; पण ७० च्या दशकात गरीब व्यक्तीसाठी ती खूप मोठी रक्कम होती. त्यामुळे रणजितने चोरीच्या उद्देशाने ३७ रुपये काढून खिशात ठेवले. हे कुटुंब श्रीलंकेत राहत होते. काही वेळाने घरमालक मसुफ सगुई यांना आपण उशीखाली ३७ रुपये ठेवल्याचे लक्षात आल्याने त्यांनी रणजीतला विचारपूस केली; मात्र रणजीतने यावर कोणतेही उत्तर दिले नाही. रणजीतचे आई-वडील चहाच्या बागेत काम करायचे आणि त्याचे कुटुंब खूप मोठे होते. त्यामुळे अपुऱ्या उत्पन्नामुळे त्याला शालेय शिक्षणही पूर्ण करता आले नाही. वयाच्या १७ व्या वर्षी रणजीतने तामिळनाडूला जाण्याचा निर्णय घेतला.

## पाल्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमधून जुळले प्रेम

प्रेम आणि युद्धात सर्व काही न्याय्य असते अशी एक म्हण आहे. अशीच एक घटना समोर आली आहे. जेथे शाळेने मुलांच्या वर्गातील पालकांचा एक ग्रुप बनवला होता. ज्यामध्ये मुलांना दिलेला गृहपाठ शेअर केला जात होता; पण यामुळे दोन विवाहित जोडप्यांमध्ये मैत्री झाली. क्लास ग्रुप संभाषण दरम्यान दोघांनी एकमेकांशी संपर्क साधला आणि हळूहळू त्यांच्यात जवळीक वाढू लागली. गृहपाठ आणि मुलांच्या शिक्षणावर लक्ष ठेवण्यासाठी हे चॅट ग्रुप शाळेने तयार केला होता. पण यामुळे भलतेच काही घडले. दोघेही पालकांचे संभाषण सुरू झाले. जे प्रेम प्रकरणापर्यंत पोहोचले; पण नंतर जे घडले, त्याने सगळ्यांनाच धक्का बसला. कारण ते दोघेही आपापल्या कुटुंबाला सोडून पळून गेले. झांग आणि वेन अशी या दोघांची नावे आहेत. ही घटना चीनमध्ये घडली आहे; पण यापासून सगळ्यांच शाळांनी धडा घेतला आहे. झांग यांना चार तर वेन यांना दोन मुले होती. दोघेही मुलांना सोडून पळून गेले. मुलांच्या गृहपाठावर बोलता बोलता ते कधी प्रेमात पडले, हे त्यांनादेखील कळाले नाही. ही गोष्ट सोशल मीडियावरुन समोर आली. झांग म्हणाली, की ती तिच्या पतीच्या कौटुंबिक हिंसाचाराला कंटाळली होती, ज्यामुळे तिच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम झाला होता. पती तिला मारहाण करायचा. झांगने वेनला पळून जाऊन नवीन जीवन सुरू करण्यास सुचवले. यानंतर, घटस्फोट न घेता, वेन झांगसोबत ६८० किलोमीटर दूर असलेल्या टियांजिन शहरात गेले तेथे ते दोघेही पाच वर्षे एकत्र राहिले.



## ड्रोनचा असाही वापर...

घाना या आफ्रिकेतल्या गरीब म्हणवल्या जाणाऱ्या देशात मेडिकल ड्रोन सेवा सुरू करण्यात आली असून ही जगातली सर्वात मोठी वैद्यकीय ड्रोन सेवा असल्याचं बोललं जातं. देशात वैद्यकीय कारणांसाठी दररोज ड्रोन्सची ६०० उड्डाणं होणार आहेत. देशातल्या जवळपास १,२०,००० नागरिकांना याचे लाभ होतील. ड्रोनच्या माध्यमातून इथल्या दोन हजार आरोग्य केंद्रांमध्ये विविध रोगांवरच्या लसी, रक्त तसंच औषधांचा पुरवठा केला जातो. ड्रोनसेवेसाठी देशात चार हब तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक हबमध्ये ३० ड्रोन असून कॅलिफोर्नियाच्या 'झिपलाईन' या कंपनीने ते तयार केले आहेत. अर्थात अशाप्रकारे ड्रोन सेवा सुरू करण्यावर सुरुवातीला आक्षेप घेण्यात आले होते. ड्रोन सेवा सुरू करण्याऐवजी देशातली आरोग्यसेवा अद्ययावर करण्यावर सरकारने भर देणं गरजेचं असल्याचं काहींचं म्हणणं होतं. घाना मेडिकल असोसिएशनने या सेवेच्या प्राथमिक चाचणीची मागणी केली होती. ड्रोन्सच्या वापरामुळे वैद्यकीय क्षेत्राला फारसा लाभ होणार नसल्याचं त्यांचं म्हणणं होतं. पण घानाच्या लोकसभेत हा प्रस्ताव ठेवण्यात आला आणि १०२ विरुद्ध ५८ एवढ्या मतांनी तो मंजूरही झाला. त्यामुळे घानामध्ये ही सेवा सुरू झाली आहे. या सेवेसाठी घाना सरकारने 'झिपलाईन'ला १२ दशलक्ष डॉलर म्हणजे ८४ कोटी रुपये दिले आहेत. मेडिकल ड्रोन सेवेमुळे रुग्णांवर लवकर उपचार व्हायला मदत होईल, असं घानाच्या अध्यक्षांचं म्हणणं आहे.





## सोन्याचा बाथटब

जपानमधल्या एका रेस्टॉरंटमध्ये सोन्याचा बाथटब तयार करण्यात आला. १३० सेंटीमीटर रुंद आणि ५५ सेंटीमीटर खोल असलेल्या या टबमध्ये बसून आंघोळ करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाडं देऊन एक ते दहा तासांसाठी या टबमध्ये निवांत डुंबता येईल. एका तासाच्या वापरासाठी ग्राहकांना काही येन म्हणजे भारतीय चलनात तीन हजार रुपये भाडं भरावं लागेल. १८ कॅरेट सोन्यापासून बनवण्यात आलेला हा जगातला पहिलाच बाथटब असल्याचा या रेस्टॉरंटचा दावा आहे. इथल्या 'हॉट स्प्रिंग' रेस्टॉरंटने हा अनोखा टब तयार करून घेतला असून तो पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहे. चीन आणि दक्षिण कोरियातल्या ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन हा बाथटब तयार करण्यात आला आहे. या देशांमधल्या पर्यटकांकडून सोन्याच्या बाथटबची मागणी होत होती, असं रेस्टॉरंटच्या मालकांचं म्हणणं आहे. या बाथटबची नोंद गिनिज बुकमध्येही करण्यात आली आहे. १५४ किलो वजनाच्या या बाथटबच्या निर्मितीसाठी ५० कोटी रुपये खर्च आला. आठ महिन्यांमध्ये तो तयार करण्यात आला. या बाथटबमध्ये आंघोळ करायला खूप मजा येईल ना?



## ग्रीनलँडची बिकट वाट

ग्रीनलँडमध्ये सतत बर्फ पडत असतो. इथलं सर्वसाधारण तापमान उणे २५ अंश सेल्सियस असतं. थंडीत ते उणे ६० अंशांपर्यंत जातं. या संपूर्ण बेटावर फक्त ५७,००० लोक राहतात. पूर्व ग्रीनलँडमध्येही लोकवस्ती आहे. पण हे स्थान मुख्य प्रवाहापासून खूप लांब आहे. इथे तुम्हाला वाहन दिसणार नाही की मोबाईलला सिग्नल मिळणार नाही. इथलं इत्तोकोरतूर्मित हे गाव समुद्राच्या किनारी वसलं आहे. थंडीत या समुद्राचं पाणी गोठून जातं. इथे एक गेस्ट हाउसही आहे. मात्र प्रतिकूल तापमान आणि फारशा सोयीसुविधा नसल्यामुळे पर्यटक इथे फिरकत नाहीत. मात्र एके दिवशी या ठिकाणीही पर्यटकांची गर्दी होईल, अशी इथल्या लोकांना आशा वाटते. ग्रीनलँड हे जगातलं सर्वात मोठं बेट आहे. नूक ही ग्रीनलँडची राजधानी. या शहराची लोकसंख्या फक्त १९ हजार आहे. जागतिक तापमानवाढीचा फटका ग्रीनलँडलाही बसू लागला आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत इथला समुद्र सप्टेंबरमध्येच गोठलेला असायचा. मात्र आता नोव्हेंबरनंतरच तो गोठू लागतो, असं इथले स्थानिक सांगतात. ध्रुवीय अस्वलंही आता शहरात येऊ लागली आहे. पूर्वी हे प्रमाण नगण्य होतं. अस्वलं आणि माणूस यांच्यात द्वंद्व पहायला मिळतं. इथल्या घरांना गरम ठेवण्यासाठी सेंट्रल हिटिंग सिस्टिमचा वापर केला जातो. इथले लोक रेनडिअरचं मांस आणि आर्टिक ४ नावाचा मासा खातात.

## यूएईची 'मिनिस्टरी ऑफ पॉसिबिलिटीज'

संयुक्त अरब अमिरातीने एका अनोख्या मंत्रालयाची संकल्पना मांडली. 'मिनिस्टरी ऑफ पॉसिबिलिटीज' असं या मंत्रालयाचं नाव आहे. विशेष म्हणजे या मंत्रालयाला कोणताही मंत्री नसतो. या मंत्रालयाची जबाबदारी कॅबिनेट सदस्यांकडे असेल. देशाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्यांवर या मंत्रालयात चर्चा होईल. तसंच भविष्याच्या दृष्टीने योग्य अशी सरकारी सिस्टिम तयार करण्यात हे मंत्रालय मदत करणार आहे. अशाप्रकारचं हे जगातलं पहिलंच मंत्रालय आहे. हे मंत्रालय देशातल्या युवा गुणवत्तेचा शोधण्यासाठी वेगळ्या योजना आखेल. देशवासीयांना सर्व सोयीसुविधांचा लाभ लवकरात लवकर मिळावा या दृष्टीनेही काही योजना आखल्या जाणार आहेत. 'मिनिस्टरी ऑफ पॉसिबिलिटीज' ऑनलाईन व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. यामुळे ६० दिवसात होणारी कामं सहा दिवसात होतील, असं त्यांचं म्हणणं आहे. तसंच लोकांना वारंवार सरकारी कचेऱ्यांच्या खेपाही घालाव्या लागणार नाहीत.



## मृत्यू महाग झाला!

हाँगकाँगमध्ये जमिनीचे दर प्रचंड वाढले आहेत. अस्थी पुरण्यासाठीही जमीन उपलब्ध होत नसल्याचं चित्र इथे दिसून येतं. या कामासाठी जमिनीचा छोटा तुकडा घ्यायचा म्हटला तरी तिथल्या नागरिकांना भरावी लागणारी रक्कम भारतीय चलनात ६२ लाख रुपये एवढी आहे. जमिनीच्या वाढत्या किंमतींमुळे इथे चार लाख अस्थिकलश पडून आहेत. ते अजूनही पुरण्यात आलेले नाहीत. हाँगकाँगमध्ये मृतांचे अस्थिकलश पुरले जातात. मात्र जमिनीच्या किंमती गगनाला भिडल्यामुळे अनेकांनी हे अस्थिकलश लॉकरमध्ये ठेवले आहेत. अस्थिकलश पुरण्यासाठी जमीन घ्यायची तर लाखो पाउंड खर्च करावे लागतात. इथे अंतिम संस्कारांसाठी जमीनच शिल्लक नसल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. सरकारी लॉकरमध्येही हे अस्थिकलश ठेवले जातात. यासाठी २८०० हाँगकाँग डॉलर म्हणजे २२ हजार रुपये भरावे लागतात. पण हे लॉकरही बुक झाले आहेत. सरकारी लॉकरमधल्या जागेसाठी इथल्या लोकांना चार वर्ष वाट बघावी लागते. अस्थिकलश पुरण्याची सोय उपलब्ध करून देण्याच्या काही संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. त्यात समुद्रात तरंगणारं स्मशान बांधण्याची कल्पना एका कंपनीने मांडली होती. मात्र त्यावर अजूनही निर्णय झालेला नाही. त्यामुळे हाँगकाँगमध्ये मृत्यूही महाग झाला आहे असंच म्हणावं लागेल.






पीक वाढले की रोगही वाढतात, फवारणी आवश्यक..

# आयारामांसाठी ट्रेनिंगची गरज - गडकरी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या काही दिवस आधी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी बंडखोरांबाबत वक्तव्य केले आहे. गडकरींना एका मुलाखतीत बंडखोर भाजपमध्ये प्रवेश करण्याबाबत विचारण्यात आले होते. त्याला उत्तर देताना गडकरी यांनी निशाणा साधला.

गडकरी म्हणाले की, भाजपचा विस्तार झपाट्याने होत आहे. पीक वाढले की त्यासोबत रोगही वाढतात. भाजपकडे भरपूर पीक आहेत, जे चांगले उत्पादन देतात, परंतु काही रोग देखील आणतात. त्यामुळे अशा आजारी पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करावी लागते.



भाजपमध्ये नवीन लोक वेगवेगळ्या कारणांसाठी येत आहेत. त्यांना प्रशिक्षण देणे, विचारधारा सांगणे आणि त्यांना कार्यकर्ता बनवणे ही आपली जबाबदारी आहे. हजार कार्यकर्ते उभे असतात, पण कधी कधी एक कार्यकर्ता काहीतरी बोलतो आणि त्या हजार कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरते.

गडकरी म्हणाले- महाराष्ट्रात माझी कोणतीही भूमिका नाही. येथील नेते सक्षम आहेत. जेव्हा त्यांना माझी गरज असेल तेव्हा मी उपलब्ध असेल. सरकार आणि प्रशासन धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. एखादी व्यक्ती धर्मनिरपेक्ष असो वा नसो, पण राज्य, सरकार आणि प्रशासन हे धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. याशिवाय आर्वी येथील निवडणूक सभेत गडकरींनी काँग्रेसवर ग्रामीण भागाचा विकास होत नसल्याचा आरोप केला.

गडकरी म्हणाले, काँग्रेसने ग्रामीण भारताच्या विकासाचा कधीच गांभीर्याने विचार केला नाही. ग्रामीण भारताला प्राधान्य दिले असते तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या आणि खेड्यात गरिबी नसती. भारताच्या 75 वर्षांच्या इतिहासात काँग्रेसने ग्रामीण भागाच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

## दारुबंदी नको असलेला उमेदवार नको




■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १० :** जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा क्षेत्रातून उमेदवारांनी प्रचाराला धडाक्यात सुरूवात केली आहे. तर दुसरीकडे जिल्हाभरातील एकूण ३०९ गावांमध्ये मुक्तिपथ व शक्तिपथ गाव संघटनेच्या नेतृत्वात मतदारांनी ठराव घेत आपला नेता दारूबंदीचा समर्थक असावा. ज्याला दारुबंदी नको, तो उमेदवार आम्हाला नको असा निर्णय घेतला आहे.

मागील ३१ वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी टिकून आहे. यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, महिला-पुरुषांनी विशेष परिश्रम घेतले आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांना दारूचे प्रलोभन घालून मत मागणाऱ्या उमेदवारांमुळे विकासाला खीळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. दारूबंदीचे समर्थन करणारा उमेदवार असल्यास दारूबंदी टिकून राहते, मजबूत होते. मतदानाच्या काळात दारू नसेल तर भांडणे शक्यतो होत नाही, शांततेच्या वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडते.

विकासासाठी निवडून दिलेल्या उमेदवाराला जाब विचारता येतो. त्यामुळे उमेदवारांकडून दारूचे वाटप होऊ नये यासाठी मुक्तिपथ-शक्तीपथ गाव संघटनेच्या माध्यमातून गावागावांमध्ये ठराव घेऊन आपला उमेदवार कसा असावा, मतदारांचे कर्तव्य आदी बाबी पटवून दिल्या जात आहेत. निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार गाव व जिल्हा दारूबंदीचा समर्थन करणारा असावा. दारूबंदी समर्थनाचे लिखित वचन निवडणुकीत उभे असणाऱ्या उमेदवाराला आम्हाला द्यावे लागेल, असे या ठरावात आहे.

## ॲड. प्रकाश आंबेडकरांना पुन्हा आठवलेंकडून ऐक्याची साद

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. १० :**



तुकड्या - तुकड्यात विभागलेला आपला समाज एकत्र येण्याची खरी गरज आहे. त्यामुळे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ऐक्याची भूमिका घेतली पाहिजे. त्यांनी अध्यक्षपद स्वीकारावे. आपण दोघेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोबत जाऊ, आपल्याला सत्तेत राहणे आवश्यक आहे, अशी साद केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी ॲड. प्रकाश आंबेडकरांना घातली.

माझा समाज नरेंद्र मोदींसोबत असल्याने त्यांच्यासोबत जायला पाहिजे, असे म्हणत रामदास आठवले यांनी अकोल्यात पुन्हा ऐक्याची भूमिका घेतली. केवळ निवडणुका लढून त्याचा काही उपयोग नाही. गोरगरीब समाजाला न्याय देण्यासाठी आपण सत्तेमध्ो जाणे आवश्यक आहे, असे रामदास आठवले म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना हटवण्यासाठी काँग्रेसची धडपड सुरू असते. मात्र, देशातील जनतेसह आम्ही खंबीरपणे त्यांच्या सोबत आहोत. राहुल गांधी व काँग्रेसकडून संविधान बदलण्याचा सातत्याने अपप्रचार केला जातो. या माध्यमातून समाजामध्ये भेद व फूट पाडण्याचे काम काँग्रेस करीत आहे, असा आरोप रामदास आठवले यांनी केला. अशा परिस्थितीत ॲड. आंबेडकरांनी सोबत यावे, असे आवाहन त्यांनी केले.

## आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडा

### समाजाला जरांगेंच्या सूचना

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. १० :** आरक्षणाचा विरोध करणाऱ्यांना पाडा. तुमच्या हिताचा निर्णय घ्या, अशा सूचना मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना दिल्या आहेत.

जरांगे यांनी आज पत्रकार परिषद घेत आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली. ते म्हणाले, आपण आरक्षणासाठी एकत्र आलो आहोत. आमच्याबद्दल संभ्रम शब्द वापरला जात आहे. पण मराठा समाजात कोणताही संभ्रम नाही. काही लोक स्वतःला निवडून येण्यासाठी संभ्रम पसरवत असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला.

जरांगे म्हणाले, आरक्षणाला ज्यांनी त्रास दिला त्यांना सोडू नका, त्यांचा उभा कार्यक्रम करा, आरक्षणाला विरोध करणाऱ्याला सोडायचे नाही. आपले कोणी काहीही करू शकत नाही, कोणाचीही सत्ता येऊ द्या, कोणालाही घाबरण्याची गरज नाही. स्वतः निवडून येण्यासाठी काहीजण संभ्रम पसरवत आहेत. त्यामुळे सावध रहा, असे ते म्हणाले.

## ओवैसींची टोकाची टीका

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १० :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'एक है तो सेफ है' या विधानावरून एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे.



'इंसाफ है तो इंडिया है, संविधान है तो सम्मान है, आंबेडकर है जिंदा है तो गोडसे मुर्दा है', असे ओवैसी म्हणाले. छत्रपती संभाजीनगर येथील एमआयएमचे उमेदवार नासेर सिद्दीकी यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना ओवेसी यांनी ही टीका केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित प्रचारसभेत 'एक है तो सेफ है' असा नारा देत आहेत. तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विदर्भात आयोजित एका सभेत 'कटेंगे तो बटेंगे' असे म्हणत सगळ्यांनी निवडणुकीत एकोपा दाखवावा, असे म्हटले होते. यावरून विरोधकांनी पंतप्रधान मोदी आणि योगी आदित्यनाथ यांच्यावर निशाणा साधला आहे. आता एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनीही पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे.

एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी छत्रपती संभाजीनगर येथील आयोजित सभेत बोलताना म्हणाले की, मजलिस म्हणत आहे की, 'हम अनेक हैं तो अखंड हैं. मोदींची एक करायची इच्छा आहे. आरएसएसची एक करण्याची इच्छा आहे. यावर मला मोदींना उत्तर द्यायचे आहे, 'इंसाफ है तो इंडिया सेफ है', 'संविधान है तो सम्मान है', 'आंबेडकर जिंदा हैं तो गोडसे मुर्दा है'. छत्रपती शिवाजी महाराजांना खऱ्या मनाने माणणारे असतील, तर प्रेम आहे. पुढे बोलताना ओवैसी म्हणाले , "पंतप्रधान मोदी महाराष्ट्राच्या निवडणुकीत काय करत आहेत. तर मोदी मराठा विरुद्ध ओबीसी करत असल्याचे ते म्हणाले.

## बीएसईची एनएचसी फूड्सच्या ४९ कोटी रुपयांच्या राइट्स इश्यूला तत्त्वतः मान्यता

लोकार्थ




कृषी मालाची निर्यात करणारी आघाडीची कंपनी एनएचसी फूड्स लिमिटेडला (एनएचसी) मुंबई शेअर बाजाराकडून (बीएसई) ४९ कोटी रुपयांपर्यंतच्या प्रस्तावित राइट इश्यूला तत्त्वतः मान्यता मिळाली आहे. हा धोरणात्मक उपक्रम भागधारकांचे मूल्य वाढविण्यासाठी आणि शाश्वत वाढीसह कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

कंपनी मोठ्या प्रमाणावर विस्ताराच्या मार्गावर आहे आणि आम्ही त्या दृष्टीकोनातून कार्यवाही करीत आहोत. राइट्स इश्यूच्या उत्पन्नाचा उपयोग वर्किंग कॅपिटलच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि काही सुरक्षित कर्जाची परतफेड करण्यासाठी केला जाईल, ज्यामुळे कंपनीचा नफा वाढेल,ह्व असे एनएचसी फूड्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अपूर्व शहा यांनी सांगितले.

३० जून २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा ३९१ टक्क्यांनी वाढून २००.८८ लाख रुपये झाला आहे.

३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीचा निव्वळ नफा २३४.७४ लाख रुपये होता, याचा विचार करता कंपनीची ही कामगिरी उल्लेखनीय आहे. ३० जून २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत एनएचसी फूड्सचा महसूल ७५ टक्क्यांनी वाढून ७३६६.१२ लाख रुपये आणि एबिटडा ९४ टक्क्यांनी वाढून ३३६.४० लाख रुपये झाला आहे. ■ ■




## झिंका लॉजिस्टीक्स सोल्यूशन्स कंपनीचा आयपीओ 13 नोव्हेंबर पासून खुला

झिंका लॉजिस्टिक्स सोल्यूशन्स लिमिटेड कंपनीने आपल्या आयपीओ माध्यमातील आगामी खुल्या समभाग विक्रीसाठी प्रतिसमभाग रु. 259/- ते रु. 273/- असा प्राईस बँड जाहीर केला आहे. कंपनीच्या विक्रीस काढण्यात आलेल्या प्रत्येक समभागाचे फेस व्हॅ ल्यू रु. 1/- आहे. झिंका लॉजिस्टिक्स सोल्यूशन्स लिमिटेड ही भारतातील ट्रक चालकांना डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देणारी ग्राहक संख्येच्या तुलनेत सर्वात मोठी कंपनी आहे.

2024 आर्थिक वर्षात या कंपनीच्या माध्यमातून देशभरात 963,345 ट्रक चालकांनी व्यवसाय केला हे प्रमाण देशातील एकूण ट्रक चालकांच्या संख्येच्या 27.52% आहे.

आयपीओ ऑफर 13 नोव्हेंबर 2024 रोजी सुरु होईल आणि सोमवार दि. 18 नोव्हेंबर 2024 रोजी बंद होईल. इच्छुक गुंतवणूकदार किमान 54 समभागांच्या लॉट साठी व त्यापुढे 54 समभागांच्या पटीत गुंतवणुकीसाठी बोली लावू शकणार आहेत. आयपीओ विक्रीत सुमारे 550 कोटी रुपये मूल्याच्या फ्रेश इश्यूचा व प्रमोटर आणि इनव्हे स्टर शेअरहोल्डर्स कडून विक्रीस काढण्यात आलेल्या 20,685,800 समभागांचा समावेश आहे. ■

## वर्ष २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीत किर्लोस्कर ब्रदर्सच्या महसुलात १३.४ टक्क्यांची वाढ

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेडने (केबीएल) आर्थिक वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने या तिमाहित नोंदवलेला करोत्तर एकत्रित नफा (पीएटी) गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत ९० टक्क्याने वाढला आहे. नफ्यातील वाढीव्यतिरिक्त, केबीएलला ऑपरेशन्समधून त्याच्या एकत्रित महसुलात लक्षणीय वाढ झाली आहे. ही वाढ १३.४ टक्क्यांनी झाली आहे. यासह दुसऱ्या तिमाहीत कंपनीच्या महसुलात १३.४ टक्के वाढ झाली आहे, तर पहिल्या तिमाहीत १४.० टक्के वाढ झाली होती. एबिटडा ६१ टक्के वाढून १५६.४ कोटी रुपये झाला आहे. उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार, एबिटडा १०.६ टक्क्यांवरून १५.१ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. पीबीटी ७८ टक्क्यांनी वाढून १२९.० कोटी रुपये झाला, तर एकत्रित पीएटी ९० टक्क्यांनी वाढून ९६.७ कोटी रुपये झाला. कंपनीची ऑर्डर बुक ३०५६ कोटी रुपयांवर स्थिर आहे.

चालू गुंतवणूक २३.३ टक्क्यांनी वाढून ६९५.९ कोटी रुपये झाली, आणि आरओसीई २२० बीपीएसने वाढून २९.० टक्के झाला आहे. ईपीएस ५.९ रुपयांनी वधारून २०.३ रुपये प्रति शेअर झाला आहे. एकत्रित स्तरावरील एकत्रित पीएटी (कर वगळून नफा) दुसऱ्या तिमाहीत ९० टक्क्यांनी वाढून ९६.७ कोटी रुपये आणि पहिल्या तिमाहीत ४२ टक्क्यांनी वाढून १६२.३ कोटी रुपये झाला आहे. ■ ■

## सणासुदीनंतर ट्रकभाडी स्थिरावली

सणासुदीच्या कालावधीत वाढलेल्या पातळीवर राहिल्यानंतर ऑक्टोबर महिन्यात ट्रक भांडी कमी होऊन स्थिरावली आहेत. फ्लीट युटिलायझेशनच्या चक्रीय स्वभावामुळे, सामान्यत:, उत्सवपूर्व हंगामात उत्पादकांच्या मालाच्या हालचालींमुळे ट्रक भाड्यांमध्ये वाढ होते.सणासुदीनंतर ही वाढ कमी होत जाते आणि नेहमीच्या पातळीवर येते. मुंबई-कोलकत्ता-मुंबई या मार्गावर ट्रकभाडे दरात २.१ टक्के घट झाली आहे. बंगळूर-मुंबई-बंगळूर या मार्गावर ट्रकभाडे दरात १.६ टक्के घट तर दिल्ली-बंगळूर-दिल्ली या मार्गावर गत महिन्याच्या तुलनेत १.४ टक्के घट झाली आहे. इतर प्रमुख मार्गांवरील ट्रक भाड्यांमध्ये फारसे बदल झालेले नाहीत. ट्रक भाडी कमी होत असता, सणासुदीच्या काळात वाहन विक्रीला चालना मिळाली.

ऑक्टोबर 2024 मध्ये वाहन विक्रीमध्ये लक्षणीय वाढ दिसून आली. ऑक्टोबर महिन्यात मासिक आधारावर नवीन प्रवासी वाहने आणि दूचाकी वाहनांच्या विक्रीत अनुक्रमे ७६% आणि ७२% वाढ झाली आहे, तर वार्षिक पातळीवर अनुक्रमे २४% आणि ३७% टक्के वाढ झाली आहे. दूचाकी आणि प्रवासी इव्हीवाहनांच्या विक्रीत मागील महिन्याच्या तुलनेत अनुक्रमे २४% आणि २८% वाढ दिसून आली आहे. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

## वंचितच्या एन्ट्रीने आव्हाडांना धोका?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** मुंब्रा-कळवा विधानसभा मतदारसंघ आमदार जितेंद्र आव्हाडांमुळे कायम प्रसिद्धीच्या झोतात असतो.



तेथे दलित, मुस्लिमांची एकगठ्ठा मते मिळवून आव्हाडांनी नेहमी यश मिळवले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे पंढरीनाथ गायकवाड दलितांची मते काही प्रमाणात घेऊ शकतात. तशी चिन्हे दिसू लागल्याने आव्हाड धोक्याच्या रेषेवर उभे असल्याचे दिसते.







